# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 26 अंक 5 ऑगस्ट 2015

या अंकात


| | | |
|---|---|---|
| 2. | धर्म समाजस्थैर्यासाठीच आहे | 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील |
| 2. | शिक्षणाचा सत्यानाश | प्रभात पटनाईक |
| 6. | विवाहाचे 'ना हरकत प्रमाणपत्र'! | मंगला सामंत |
| 11. | आपली बाजू नेमकी कोणती? | डॉ. हमीद दाभोलकर |
| 13. | लेखकाचा मृत्यू | विश्राम गुप्ते |
| 15. | मराठी नियतकालिकांची हतबलता | राम जगताप |
| 21. | अजब न्याय.... | सुभाष थोरात |
| 23. | 'मराठी' ची चर्चा आणखी एकदा; पुन्हा पुन्हा | सुरेश सावंत |
| 26. | नेटिझन्स इतक्या उर्मटपणाने का वागतात? | प्रभाकर नानावटी |
| 29. | देव-धर्मवेड्या समाजाचं व्यंगचित्र | अवधूत परळकर |
| 32. | मरणभय-आत्मा-पुनर्जन्म | य.ना.वालावलकर |



संस्थापक – संपादक
**दि. य. देशपांडे**
(1918-2006)

कार्यकारी संपादक
**प्रभाकर नानावटी**

**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com


www.aajachasudharak.in

# धर्म समाजस्थैर्यासाठीच आहे

"परधर्मांच्या लोकांनी आमच्या धर्माच्या लोकांस आपल्या धर्मात घेतले म्हणजे आमच्या धर्मगुरूंची छाती दु:खाने फाटून जाते! लोकांनी धर्मांतर करू नये म्हणून ते गीतेतील तत्त्वज्ञान दाखवतील, वेदांतील सुरस काव्य पुढे करतील, उपनिषदांतील गहन विषय सांगतील, पण धर्माच्या नावाखाली धर्माचाच घात करणाऱ्यांची कानउघाडणी त्यांच्या हातून होणार नाही. असे तर हे धर्ममरतड! असे तर हे धर्मगुरू! आणि असे तर हे शंकराचार्य! बसल्या बसल्या नाटकाप्रमाणे वेदांचे भाषांतर केल्याने धर्माची सुधारणा होणार नाही. गावोगाव पालखीत मिरविल्याने धर्माची ग्लानी जाणार नाही. गीतेवर कितीही लंबी प्रवचने झोडल्याने धर्म जागा होणार नाही. गणपतीचा महिनोगणती उत्सव केल्याने धर्मास जोम येणार नाही. जो धर्माचा विस्तार म्हणून मानण्यात येतो त्या बहुजन समाजास धर्माच्या खऱ्या मार्गावर लावल्यानेच धर्माचे रक्षण होणार आहे..धर्म हा समाजस्थैर्यासाठीच निर्माण झाला आहे. अर्थातच समाजाचा उत्कर्ष म्हणजे धर्म असा त्याचा अर्थ ठरतो आणि जोपर्यंत धर्माचा हा अर्थ मानला जतो, तोपर्यंत समाजाचा उत्कर्षच असतो. आज जे जे समाज अध:पतन पावले आहेत, त्या त्या समाजाच्या धर्माची प्रकृति बिघडली आहे यात शंका नाही!"

'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील

•••

# शिक्षणाचा सत्यानाश

*प्रभात पटनाईक*

शिक्षण.....खाउजा.....बाजारीकरण....

एनडीए सरकारने शिक्षणाच्या क्षेत्रात महत्वाच्या पदांवर केलेल्या निर्बुद्ध चमच्यांच्या नेमणुकींमुळे शिक्षणक्षेत्राच्या हो घातलेल्या हानीबद्दल धास्ती वाटणे साहजिकच आहे. पण व्यवस्थेला भेडसावणारी ही एकमेव बाब असल्याचे मानायचे कारण नाही. भांडवल-जागतिकीकरणाच्या युगात शिक्षणाचा विनाश करू पाहणाऱ्या प्रक्रियांची जी मालिका सुरू होते त्यामध्ये भारतीय संदर्भात जमातवादी फॅसिझमचा शिक्षणक्षेत्रात शिरकाव हा एक अधिकचा, पण महत्वाचा, घटक आहे एवढेच. सत्यानाश प्रक्रिया, तिच्या `का व कसे' सांगणाऱ्या सांगोपांग स्वरूपात समजून घ्यायला हवी. टेरी इगल्टन या ब्रिटिश वाङ्मय सिद्धांतकाने एक मजेशीर किस्सा सांगितला आहे. द. कोरियाच्या भेटीदरम्यान एका विद्यापीठाचा सीईओ (हल्ली विद्यापीठाच्या प्रशासकीय प्रमुखाला असे म्हणण्याचा प्रघात आहे) त्याला विद्यापीठ दाखवत असतो. चकाकत्या प्रयोगशाळा आणि बढाईपूर्ण उपकरणे पाहिल्यानंतर टेरीने क्रिटीकल स्टडीजचा विभाग पाहण्याची इच्छा प्रदर्शित केली. ते ऐकून सीईओ चक्रावला. अशा नावाचा एखादा विभाग असू शकतो, याची त्याला

सुतराम कल्पना नव्हती. तो आपल्या मदतनीसाकडे वळला, पण व्यर्थ. `नंतर आम्ही चौकशी करू' असे त्याने आश्वासन दिले. शिक्षण क्रयवस्तू म्हणून नफ्यासाठी विकणाऱ्या खाजगी संस्था `आपण हे नफ्यासाठी करतो' हा आरोप फेटाळून लावतील. कारण आपला नफा हा त्या पुन्हा स्वत:मध्येच ओततात. पण भांडवली उद्योगात देखील नफा पुन्हा त्यांच्यातच ओततात. त्यामुळे त्यांना नफेखोर म्हणण्याचे कुणी थांबत नाही. नफा पुन्हा त्यातच ओतला जाणे हा काही उद्योगाचा फार मोठा सद्गुण आहे, असे समजायचे कारण नाही. नफा हा शेवटी नफाच. नफा मिळवणाऱ्या संस्था असतातच नफेखोर. त्यांना नॉन-प्रॉफिट मेकींग म्हणायचे कारण नाही.

क्रयवस्तूकरणाचा एक परिणाम अगदी स्पष्टपणे समजून आला आहे आणि बराच चर्चिला देखील गेला आहे - तो म्हणजे `नाहीरें'ना शिक्षण प्रक्रियेतून वगळणे. अर्थात क्रयवस्तूकरणाचे नव-उदारमतवादी समर्थक सुचवतात की नाहीरे वर्ग देखील शैक्षणिक कर्जाचा अवलंब करून शिक्षण घेऊ शकतोच. पण ज्या समाजात नोकरीची हमी नाही, तिथे शैक्षणिक कर्ज काढणे ही विद्यार्थ्यांच्या सार्वत्रिक आत्महत्यांची नांदी ठरू शकते, अगदी गेल्या पंधरा वर्षात शेतकऱ्यांच्या सार्वत्रिक आत्महत्या होताहेत,

त्याप्रमाणे, शैक्षणिक कर्ज घेण्यातला नेमका हा धोका, ते फेडायची वेळ आली की त्यासाठी मार्ग उपलब्ध नसणे, `नाहीरे' वर्गाला हा पर्याय स्विकारण्यापासून मोठया प्रमाणात परावृत्त करू शकतो. थोडक्यात शिक्षणाचे रूपांतर नफेखोर खाजगी संस्थांकडून क्रयवस्तू म्हणून होणे याचाच परिणाम म्हणजे नाहीरे वर्गाला ते नाकारले जाणे.

क्रयवस्तूकरणाचे आणखी देखील परिणाम संभवतात, आणि ते दुर्लक्षणीय नाहीत. पहिला म्हणजे गुणवत्तेचा ऱ्हास. शिक्षण प्रक्रियेचे उत्पादन, म्हणजे ज्या व्यक्तीमध्ये शिक्षण ही गोष्ट क्रयवस्तू म्हणून शिरते ती व्यक्ति, क्रयवस्तू झाली की, शिक्षण सर्वार्थाने क्रयवस्तू बनते. अर्थात खूप आधीपासूनच शिक्षित व्यक्ती जॉब मार्केटमध्ये जॉबच्या शोधात असायच्या हे खरे आहे. याचा अर्थ असा काढायचा का, की शिक्षित व्यक्तींचे रूपांतर क्रयवस्तू म्हणून खूप आधीपासूनच झाले आहे, आणि आता नव्याने काहीच नाही घडलेले? तसे नाही. क्रयवस्तूचे सर्वतोपरी महत्त्वाचे लक्षण असे की तिच्या विक्रेत्याला तिचे काहीच उपयुक्तता मूल्य नसते, असते ते केवळ विनिमयमूल्य. विशिष्ट रक्कम, इतर क्रयवस्तूंवर एका विशिष्ट प्रमाणातील सत्ता, व्यक्तीमधे कच्चा माल म्हणून शिरणारे शिक्षण जेव्हा क्रयवस्तू बनते, आणि ती व्यक्ति स्वत: क्रयवस्तू बनते, तेव्हा त्या व्यक्तीच्या लेखी शिक्षणात उपयुक्तता मूल्य उरत नाही, तर फक्त विनिमयमूल्य शिल्लक राहते. थोडक्यात शिक्षण हे बाजारात एक विशिष्ट रक्कम मिळवून देणारे साधनच केवळ उरते. आताच्या परिस्थितीत नव्याने जे घडते आहे ते नेमके हे. शिक्षणाच्या क्रयवस्तूपणाच्या मुळाशी आहे, ते हे.

**क्रयवस्तूपणा नवोन्मेषाचा नाश करतो**

थोडक्यात, जेव्हा शिक्षण क्रयवस्तू होते, त्यावेळी विद्यार्थ्यांमध्ये कुतुहल जागृत करणे, त्याला चौकस बनवणे किंवा संकल्पनांच्या महान विश्वाचे त्याला दर्शन घडवणे ही त्याची कार्ये संपुष्टात येतात. आता ते असते केवळ कॅप्सुलस्वरूपी, जी गिळली की जॉब मार्केटमधे भेटेल त्याला जास्त थोरले विनिमयमूल्य, जास्त मोठे पॅकेज. शिक्षण क्रयवस्तू बनल्याने संपते सृजन (आणि सृजनानंद, मौलिकता), आणि हरपते दिल्या पलीकडे जाणारी दृष्टी. दिल्या पलीकडे जाणे हाच सर्जक विचारांचा मापदंड असल्याने क्रयवस्तूकरण सर्जक विचारांना मारक असते. गंमत अशी की या प्रकारचे क्रयवस्तूकरण `बनचुक्या' भांडवली महानगरी देशांपेक्षा, भारतासारख्या नवोदित राष्ट्रांमध्ये अधिक वेगाने आणि जहरीपणे फैलावते. त्याचे एक कारण असे की नवोदित राष्ट्रांमध्ये अधिक आक्रमक, सामाजिकरित्या अधिक

चढाऊ आणि राजकीयदृष्ट्या अधिक प्रभावी मध्यमवर्ग अधिक प्रमाणात आढळतो आणि दुसरे म्हणजे इथे पाटी कोरी असल्याने तिच्यावर लिहिणे जास्त सोपेदेखील असते.

क्रयवस्तूकरणाचे आणखी एक फलित (बोनस!) म्हणजे त्याची निर्मिती (पक्षी-शिक्षित व्यक्ति), सामाजिकदृष्ट्या पराकोटीची असंवेदनशील आणि पूर्णत: स्वत:मध्ये मश्गुल अशी निपजते. कष्टकरी जनतेबद्दल य:कश्चितही सहानुभूती बाळगायला ती मुळातच असमर्थ असते. हा गुणधर्म हजारो वर्षांची जातीय दडपशाहीची आणि संस्थात्मक विषमतेची परंपरा असलेल्या, आणि कष्टकरी जनतेकडे तुच्छतेने पाहण्याची जन्मजात सवय असलेल्या, आपल्या देशात विशेषत: फारच उपयुक्त ठरतो.

क्रयवस्तूकरणाची ही सगळी वैशिष्ट्ये सद्यकालीन कॉर्पोरेट भांडवलशाहीच्या दृष्टीने आवश्यक आहेत. शेतकऱ्यांचे संपत्तीहरण, छोटया उद्योगांचे स्थानहरण, बेरोजगारीत वाढ, कमी रोजगार, छुपी बेरोजगारी आणि प्रासंगिक रोजगार अशा मार्गांनी कष्टकऱ्यांवर प्रचंड वरवंटा फिरवणे आणि त्याद्वारे श्रम बाजारातील लवचिकतेला अद्याप बळी न पडलेल्या मूठभर तथाकथित संघटित कामगारांचे खरे वेतन खालावत नेणे, हा भारतातील भांडवलाचा सद्यकालीन अजेंडा आहे. त्याला प्रतिकार शक्य आणि आवश्यक आहे. तो निर्माण होत नाही याचे कारण त्याला सामाजिकदृष्ट्या असंवेदनशील आणि शिक्षणामुळे बधिर झालेल्या शहरी बुद्धीजीवांचा पाठिंबा मिळत नाही. (अर्थात हा मध्यमवर्ग जेव्हा स्वत:च अरिष्टात सापडेल, तेव्हाच ही परिस्थिती बदलेल. हे अटळ आहे आणि अगदी नजीक आहे. पण तेव्हादेखील शिक्षणाचे क्रयवस्तूकरण ही गोष्ट प्रतिकाराची धार कमीच करीत असेल.)

शिक्षणाचे क्रयवस्तूकरण हल्लीसारख्या अरिष्टकाळात बुद्धीजीव्यांचे सांत्वन करते आणि त्याद्वारे नवउदारवादी कॉर्पोरेट भांडवलशाहीची मनोभावे सेवा करते. असे असले तरी कष्टकरी जनतेचा प्रतिकार हळूहळू ठासला जात असतोच. हा प्रतिकार मोडण्यासाठी जमातवादी फॅसिस्ट शक्तींबरोबर हातमिळवणी करणे हे जागतिकीकरण झालेल्या कॉर्पोरेट-आर्थिक स्वल्पतंत्रांसाठी आवश्यक बनते. अशी कॉर्पोरेट जमातवादी युती ही सध्याच्या एनडीए अवतारामागे आहे. जमातवादी दंगे घडवून आणणे, उत्तर प्रदेशासारख्या महत्त्वाच्या राज्यात जमातीय ध्रुवीकरण घडवून आणणे आणि त्याचबरोबर अर्थातच कॉर्पोरेट-आर्थिक स्वल्पतंत्रांकडून निवडणूक प्रचारासाठी दणकट अर्थसाहाय्य मिळवणे, या मार्गाने 2014 साली एनडीएने सत्ता काबीज केली. एकदा सत्ता हातात आली की आता आपल्या कार्पोरेट धन्यांचे ऋण फेडण्यासाठी गरिबांसाठीच्या कल्याणकारी योजनांमध्ये कपात, सगळी संसदीय कार्यप्रणाली झुगारून तीनदा पटलावर आणलेला जमीनबळकाव अध्यादेश, आणि लवकरच येऊ घातलेली श्रम बाजाराच्या लवचिकतेची तरतूद - या विविध मार्गांचा ती अवलंब करते आहे. ह्या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून युतीतील जमातवादी फॅसिस्ट शक्ती आपले मनुष्यबळ आणि आपली कल्पनाप्रणाली शिक्षणव्यवस्थेत आणताहेत. शिक्षणाचा सत्यानाश दोन दिशांनी होताना दिसतो. शिक्षणाचे क्रयवस्तूकरण आणि शिक्षणाचे जमातीकरण. धोरणांच्या क्षेत्रात कॉर्पोरेटजमातवादी युती जे करू पाहते त्याच गोष्टींचे प्रतिबिंब या दोन प्रवृत्तींद्वारे शिक्षणक्षेत्रात पडल्याचे दिसून येते. क्रयवस्तूकरण आणि जमातीकरण या दोन प्रवृत्तींमध्ये विरोध नाहीच.

वरवर पाहता हे चमत्कारिक वाटेल. आपण आता ज्ञान-अर्थव्यवस्थेच्या टप्प्यात आहोत, नाही का? आणि म्हणून शिक्षण-व्यवस्था आमूलाग्र बदलायला हवी, हो ना? आणि ज्ञानमुमुक्षुंच्या डोक्यात हिंदुत्ववादी गोटे भरले असतील, पुराणे आणि इतिहास यांच्यातला फरक जर पुसून टाकला जात असेल आणि गरीब व परीघावरील लोकांच्या बाबतीत

जर त्यांच्या मनात द्वेष भरवला जात असेल तर हा आमूलाग्र बदल होणार कसा? खरे तर शिक्षणाचे जमातीकरण थोपवणे हे कॉर्पोरेट-भांडवलशाहीने करायला नको का?

**ज्ञान आणि कौशल्य यातील भेद**

ही मांडणी, आणि एकूणच ज्ञान-अर्थव्यवस्थेबद्दलची सगळी बडबड एक महत्वाची गोष्ट विसरते. ती म्हणजे ज्ञान आणि कौशल्य यातील भेद. संकल्पनांच्या विश्वाशी समीक्षात्मक पद्धतीने जोडले जाणे हे आपल्यासारख्या देशातील कॉर्पोरेट-भांडवलाला अभिप्रेत नसतेच. अशा ज्ञानाचा अभाव फार तर निसर्ग विज्ञानातील प्रगती रोखून धरेल, पण आपण महानगरी देशांमधून अशा प्रगतीची निष्पत्ती केव्हाही आयात करू शकतो. कॉर्पोरेट भांडवलशाही असो किंवा साम्राज्यशाही-दोन्हींना देशामध्ये मूलभूत संशोधनाची वढ व्हावा, यात रस नसतोच. कॉर्पोरेट-भांडवलाला असे संशोधन मुळातच अनावश्यक वाटते, (त्यापेक्षा महानगरी देशांमधून अशा प्रगतीची निष्पत्ती आयात करणे त्याला अधिक सोयीस्कर वाटते) आणि साम्राज्यशाहीला महानगरी वरचष्मा (आणि आपल्यासारख्या देशाचे बांगुळी परावलंबित्व) कायम ठेवायचे असल्याने असे संशोधन आपल्यासारख्या देशात होऊ नये असेच वाटत असते.

समाजविज्ञान आणि मानसशास्त्राचा विचार केला तर संकल्पनांच्या विश्वाशी समीक्षात्मक पद्धतीने जोडले जाणे हे कॉर्पोरेट-जमातवादी युतीच्या दृष्टीकोनातून अभद्रच असते, कारण त्यातून निष्पन्न काय होणार तर मार्क्सवादी, आंबेडकरवादी, पुरोगामी-राष्ट्रवादी, ऐहिक-लोकशाहीवादी आणि स्त्रीमुक्तीवादी संकल्पना! कॉर्पोरेट-भांडवलशाही आणि हिंदुत्ववाद-दोन्हींच्या दृष्टीने `लाल' धोक्याचेच भाग. (चेन्नई आयआयटीमध्ये चालणाऱ्या आंबेडकर-पेरीयार अभ्यासवर्गावर काही काळापुरती बंदी घालून मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे सांत्वन करण्याचा जो प्रयत्न झाला. त्या संदर्भात काहींनी त्या अभ्यासवर्गाला लाल संघटनांचे रूप द्यायचा प्रयत्न केला, हे लक्षणीय आहे.)

कॉर्पोरेट भांडवलशाहीला हवी असतात ती स्वस्त दरात उपलब्ध होणारी कौशल्ये, ज्ञान नव्हे. आंतरराष्ट्रीय भांडवलालादेखील हे हवे असते ते आपल्यासारख्या देशात कुशल मनुष्यबळ, जे महानगरी भांडवली देशातील मनुष्यबळापेक्षा कमी पगारावर काम करीत असल्याने त्यांचा नफा फुगवेल. मात्र संकल्पनांच्या विश्वाशी समीक्षात्मक पद्धतीने जोडले जाणे, ही ज्ञानाची बाजू त्यांना अजिबात नको असते, उठता बसता ज्ञान-अर्थव्यवस्थेच्या टप्प्यात आपण आलो असल्याचा जप केला तरी. एनडीए सरकारने शिक्षणाच्या संदर्भात तयार केलेला जवळपास प्रत्येक मसुदा खासगीकरणाची आणि सार्वजनिक-खासगी भागीदारीची गरज असल्याचे आवर्जून सांगतो, हे लक्षणीय आहे. याचे कारण उघड आहे. शिक्षणाचे खासगीकरण आणि शिक्षणाचे जमातीकरण उत्तमपैकी हातात हात घालून जाऊ शकतात.

**आणखी एक महत्त्वाचा मुद्दा**

सरकारी क्षेत्रात (जिथे वित्तीय तूट पाचवीला पुजलेली असते). आणखी खाजगी क्षेत्रात (जे नफा कमावण्यासाठीच निर्माण झाले आहे), दोन्हींकडे कंत्राटी, हंगामी किंवा पाहुणे शिक्षक नेमून त्यांना कमी पगारावर भरपूर राबवण्याची पद्धत पडली आहे. एकाच संस्थेमध्ये दुहेरी पद्धतीच्या नेमणुका- एका बाजूला व्यवस्थित पगार असणारे मोजके प्राध्यापक, आणि दुसऱ्या बाजूला कमी वेतनावरील दुय्यम प्राध्यापकांची फौज ही रचना देखील कॉर्पोरेट-जमातवादी युतीच्या दृष्टीकोनातून सोयीचीच. कारण आपल्याला मिळणाऱ्या पगारामुळे आणि सन्मानामुळे सुखावलेले, आणि त्यावर पाणी सोडावे लागेल की काय या भीतीने धास्तावलेले भरपूर-पगारी प्राध्यापक प्रस्थापित व्यवस्थेविषयी टीकात्मक भूमिका घेणार नाहीत आणि भरपूर राबणारे कमी वेतनावरील दुय्यम प्राध्यापक हे अशाश्वततेच्या

भीतीखाली दबले असल्याने सहज चिरडता येतात. अशा पद्धतीची तडजोडवादी दुहेरी रचना शिक्षणाचा सत्यानाश करायला हातभारच लावत असते.

(अनुवाद: शरद नावरे)

जीवनमार्गच्या सौजन्याने

*sharadnavare@gmail.com*

•••

# विवाहाचे 'ना हरकत प्रमाणपत्र'!

*मंगला सामंत*

महिला....जीवनशैली....युवा....

अलीकडे एक चर्चा अचानक उफाळून आली, ती अशी की, विवाह अंतर्गत पतीची शरीरसंबंधाबाबत असणारी पत्नीवरची जबरदस्ती हा 'बलात्कार' समजायचा का? मात्र पतीच्या या जबरदस्तीच्या मुद्द्यावर बोलण्यापूर्वी, पहिल्या प्रथम विवाहाविषयी थोडं प्राथमिक जाणून घ्यायला हवं. स्त्री-पुरुषांना एकमेकांच्या साथीने आणि पुढे आधाराने सहजीवन जगता यावे, म्हणून तरुणपणातच त्यासाठी जी निष्ठेची आणि प्रेमाची बैठक घातली जाते, तिला 'लग्न' म्हणतात.

तसं म्हटलं तर, मानवाच्या बाबतीत लग्न म्हणजे फक्त शरीरसंबंध असा अर्थ असू नये. कारण तसे संबंध प्राचीन काळापासून विवाहाशिवायच होत होते आणि आजही होऊ शकतात. ते नैतिक की अनैतिक हा खरंतर निव्वळ 'मानण्याचा' भाग आहे. कारण विवाहांतर्गत असोत किंवा विवाहपूर्व असोत, खुशीच्या शरीर संबंधांची स्त्री-पुरुषांची कृती ही एकसारखीच असते. त्यामुळे हे संबंध पापमय आणि ते संबंध पुण्यकारक असं वेगळं काही नसतं, हे आपल्याला माहीत आहे.

स्त्री-पुरुष संबंधांतून पुनरुत्पत्ती होणे, हा निसर्गनियम आहे. सजीव जाती या पुनरुत्पतीतूनच जिवंत राहतात आणि त्यातून निसर्ग जिवंत राहतो. त्यानुसार निसर्गाकडून सर्व प्राणीमात्रांचे जीवनचक्र निश्चित केले जाते. त्यामध्ये प्राण्याचा आहार, निवारा, त्यांच्या प्रणयाराधनेच्या पद्धती, प्रजोत्पादन, अपत्य संगोपनाच्या पद्धती, बाल्यावस्थेचा काळ, मातृ-अवस्थेचा काळ, हे सर्व काही निसर्गाकडून जैविक (biological) यंत्रणेद्वारा नियंत्रित केलेले असते. त्यामध्ये प्राणीमात्रांना स्वतच्या इच्छेने काही बदल करता येत नाहीत. तसे केल्यास त्या प्रजातीचा विनाश ओढवतो. उदा. कावळ्याने पाण्यात अंडी घालण्याचा प्रयत्न करणे, किंवा सशाने झाडावर निवारा शोधणे, यामध्ये त्यांचा विनाश आहे. माणसाबाबतही हेच निसर्ग नियम आहेत. निसर्गाचे ते नैतिक नियम म्हणावे लागतात, आणि त्याचा भंग मानवजातीने केल्यास हा विनाशाचा नियम मानवजातीलाही आहे.

निसर्गाने विशेषतः सस्तन प्राण्यात माता-मादीकडे प्राणीवंशाचे संवर्धन, संरक्षण करण्याचे आपले महत्त्वाचे कार्य सोपवलेले आहे. नरामध्ये हा विचार नाही. सस्तन नर-मादीमध्ये शरीर संबंध त्याकरिताच निसर्गाने मुक्त ठेवलेले असतात. म्हणजे प्रजोत्पादनातील भूमिका दोघांनाही सहजतेने पर पाडता येतात. ना कुणाला कामभावना मारून ठेवून

जगावे लागत ना कुणावर संबंधाची जबरदस्ती होत! माता-मादी जेव्हा मातृत्व काळात असते, तेव्हा तिला अपत्यांचे संगोपन करण्यास स्वस्थता मिळावी, वेळ मिळावा, म्हणून त्या काळात पुरेसा हिंस्रपणा तिच्यामध्ये आलेला असतो. ज्यायोगे ती तिच्या नराला तिच्या कुटुंबापासून दूर ठेवून पिल्लांचे रक्षण व संगोपन करीत असते. पण त्या सस्तन नरामध्ये कामवासनेचे हार्मोन (testosterone) हे माता-मादीपेक्षा जास्त प्रमाणात असते. अर्थात मग नराची अतिरिक्त कामभावना त्याला शमविता येण्यासाठी, मुक्त लैंगिक पद्धतीचा त्याला उपयोग होत असतो. जी मादी प्रसवा नसते, तिच्या समवेत तो कामभावना भागवू शकतो. त्यामुळे नरासाठी इतर मादींपर्यंत पोहोचणे हे निसर्गतत्त्व साध्य होते. यामागे एका माता-मादीची पिल्ले काही कारणाने दगावली तर दुसरीकडे पुनरुत्पत्ती होत राहावी आणि त्याकरिता नर हा जास्त कामभावनेचा असण्याची ही निसर्गाची किमया असावी, असं वाटतं.

स्त्री-पुरुष हे सस्तन प्राण्यातून उत्क्रांत झालेले आहेत. शिवाय इतर पशूंमध्ये असणारा समागमासाठीचा 'हिट पीरियड' उत्क्रांतीच्या एका टप्प्यावर माणसामधून नष्ट झालेला दिसतो. माणूस हा बुद्धीवर चालणारा प्राणी आहे. ही बुद्धी विचाराने वापरल्यासच माणसाची प्रगती आहे, आणि अविचारात माणसाचा विनाश आहे. पण दुर्दैवाने माणूस तसा विचाराने वागलेला नाही किंवा वागत नाही, हे वास्तव आहे. त्याने अनेक निसर्गनियमही धुडकावलेले आहेत. विशेषतः विवाहप्रथा आणून माणसाने स्त्री-पुरुष मुक्त संबंधाचा निसर्गनियम पहिल्याप्रथम धोक्यात आणला. सस्तन पशू मातेप्रमाणे अपत्य संगोपनाचे, संरक्षणाचे काम पुरुषापेक्षा स्त्रीवर जास्त निर्भर असते. त्या मातृत्वाच्या महत्त्वाच्या काळात progesterone, prolactin, oxytocin ही हार्मोन्स स्त्रीमधील अपत्याविषयीची मानसिक-भावनिक गुंतवणूक वाढवतात. मुळात कामभावनेचे हार्मोन कमी असणाऱ्या स्त्रीमध्ये कामवासना त्यामुळे मंदावते. नवजात पिढीसाठी निसर्गाच्या अशा वेगवेगळया प्राणीजातीत भिन्न तरतुदी आपल्याला दिसतात. स्त्री ही सस्तन पशू मातेसारखी हिंस्र होऊन पुरुषाला दूर ठेवत नाही. पण तिच्यातील कामभावना मंद करून, तिला अपत्य संगोपनाला वेळ देता यावा अशी सोय निसर्ग करतो. पण पुरुषामधील कामभावनेचे हार्मोन सस्तन नराप्रमाणे, स्त्रीपेक्षा सुमारे वीस पटीने जास्त असते आणि अपत्य त्याचं स्वतःचं म्हणून त्याला समजत असलं तरी पुरुषामध्ये स्त्री इतके हार्मोनल फरक होत नाहीत. त्यामुळे त्याची कामभावना तशीच तीव्र राहते, आणि सस्तन प्राण्याच्या नैसर्गिक नियमानुसार पुरुषसुद्धा पत्नीकडून भागवल्या न जाणाऱ्या कामभावनेसाठी अन्य पर्यायाच्या शोधात राहतो. मात्र अन्य कुणा स्त्रीशी विवाहबाह्य संबंध हा व्यभिचार, फसवणूक म्हणून समाजाने ते पाप ठरविले आहे. ते विवाह करणाऱ्यांसाठी योग्यच आहे. परंतु त्यामुळे पुरुषाचा प्रश्न सुटत नाही आणि मग विवाहित पुरुषाला त्याची अतिरिक्त कामभावना शमविण्यासाठी पत्नीवर बळजबरी केल्याशिवाय अन्य मार्ग राहत नाही. या परिस्थितीवर समाज जर कोणताही पर्याय देऊ शकत नसेल, तर मग विवाहांतर्गत स्त्रीवर होणाऱ्या जबरदस्तीला 'बलात्कार' म्हणायचा का? अशा रीतीने विवाह हे मानवी समाजात जणू कशाही पद्धतीच्या आणि जबरदस्तीच्या शरीरसंबंधाचे एक 'ना हरकत प्रमाणपत्र' झालेलं आहे. जे पुरुष पत्नीवर जबरदस्ती करीत नाहीत, आणि ज्यांचे अन्य कुठेही संबंध नाहीत, ते पुरुष 'नॉर्मल' किंवा 'सभ्य' अशा विविध व्याख्या आपण करून ठेवलेल्या आहेत.

तरीही स्वतःच्या कामभावनेवर नियंत्रण ठेवू शकणारे अपवादात्मक पुरुष सोडले तर अन्य सभ्य वाटणारे पुरुष घराबाहेर पडल्यावर स्वतःला किती आवरू शकतात, हा मोठा संशोधनाचा विषय ठरावा. गर्दीत पुरुषांकडून होणाऱ्या विनयभंगाला बहुसंख्य स्त्रियांना सामोरे जावे लागते. वास्तविक कामप्रवृत्ती ही एक सहज, स्वाभाविक, नैसर्गिक प्रेरणा आहे आणि या ऊर्मीचे नियंत्रण प्रत्येक स्त्री-पुरुषाच्या मेंदूकडून होत असते. अत्यंत गुंतागुंतीची असणारी ही काम-

यंत्रणा बदलून टाकण्यात माणसाला अजून यश आलेले नाही, आणि त्यात भर म्हणून या नैसर्गिक यंत्रणेत अडथळा करणारी विवाहप्रथा माणसाने आणून उभी केलेली आहे. बरं, एवढ्यावरच हे थांबलेलं नाही. तर विवाहामुळे पुरुषाच्या मुक्त कामेच्छेच्या होणाऱ्या कोंडीचा गैरफायदा घेणारी एक पुरुषप्रवृत्ती पुढे सरसावलेली दिसते. मग जे प्रत्यक्षात मिळविण्यात पुरुषाला त्याच्या जीवनात अपयश आहे, त्याला वाट करून देण्यासाठी सेक्स सीन्स, बेडसीन्स, बलात्कार वगैरे प्रसंगांचा चित्रपटांतून वाढत्या प्रमाणात उपयोग केला जातो, जे पाहण्यास पुरुषवर्ग गर्दी करतो. पोर्नफिल्म तयार करण्याचे व पाहण्याचे पुरुषांमधील प्रमाण वाढत चाललेले आहे. आणि आता तर हातात आलेल्या स्मार्टफोनमधल्या इंटरनेटमुळे असे चित्रपट सीन्स बघणं, एकमेकांना क्लिपिंग्सची देवाणघेवाण करणं याचंही प्रमाण वाढलं आहे.

विवाह-चौकटीतील संबंध तेव्हढे नैतिक या संस्कारामुळे विवाहपूर्वसुद्धा काही करता येऊ शकत नाही आणि दुसरीकडे, ही सार्वजनिक कामुक दृश्ये पुरुषांना चिथावत राहतात. त्यातून मानसिक अस्वस्थ झालेले पुरुष (अपवाद वगळता) अन्य स्त्रीच्या मोहात पडतात. पण बरोबरीच्या सन्मान्य स्त्रियांनादेखील समाजाने विवाहाच्या बंधनामध्ये ठेवलेलं असतं. म्हणून मग संधी मिळेल त्याप्रमाणे व तिथे, एकट्या सापडलेल्या स्त्रीवर बलात्कार करू पाहणे, किंवा वेश्येकडे जाणे, संबंधांची दृश्ये पाहणे, किंवा समिलगी संबंधातून लैंगिक समाधानाचा हेतू साध्य करू पाहणे, असे प्रयत्न पुरुषांकडून असहाय्यपणे होत राहतात. मग यापकी नैतिक कशाला म्हणायचं? किंबहुना हे सर्व समाजाच्या भीतीने चोरून चालल्यामुळे, गुन्हेगारी निर्माण होते. त्याबाबत खऱ्या कारणांना सामोरं न जाता आपल्या समाजात 'स्त्रियांना जबाबदार धरणे' हा तर काहीही न करता, कारणे देण्याचा सोपा मार्ग आहे. अशा दिशाभूलीतून गुन्ह्यांचे प्रमाण वाढत राहाते आणि गुन्ह्यांच्या वारंवारतेमुळे त्यात वैविध्य आणण्याची एक विकृती समाजात उद्भवते. म्हणजे एकाच वेळेला परिस्थितीचा राग, सूड, वैफल्य शमवता येऊन दुसऱ्याच्या वेदनेतून, अपमानातून आनंद किंवा समाधान मिळविण्याचा प्रयत्न, अशी ती भयानक विकृती असते. उदा. प्रेमभंगातून प्रेयसीला विद्रूप करणे, लहान मुला-मुलींशी शरीरसंबंध करण्याचा प्रयत्न करणे, स्त्रियांच्या चेंजिंग रूममध्ये कॅमेरे लावून ब्लॅकमेलिंगचा आनंद घेणे, छेडछाडीला विरोध करणाऱ्यांची हत्या करणे, अनाथ, अपंग वा मतिमंद स्त्रीच्या स्थितीचा फायदा उठवून तिच्याशी संबंध करू पाहणे अशा प्रकारे काही पुरुषांकडून होणारे क्रौर्य आणि विकृती हे त्यांचे मनस्वास्थ्य बिघडल्याचे स्पष्ट पुरावे आहेत.

यापैकी काहीही न करणाऱ्या सरळमार्गी पुरुषांची मन:स्थिती सतत तणावाखाली असू शकते. कामभावनेची पूर्तता, अर्धवट पूर्ण होण्यामुळे प्रक्षुब्धता आणि बेचैनीतून त्यांचे चिडचिड करण्याचे प्रमाण वाढू शकते. एकप्रकारची अस्वस्थता त्यांना ग्रासून राहते, जी कशामुळे आहे हे त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना उमगत नाही. थोडक्यात, विवाहप्रथेने निसर्गाच्या स्वयंस्फूर्त कामभावनेला जे आव्हान दिलेलं आहे, त्यामुळे एकतर स्त्रीवर विवाहांतर्गत पतीकडून 'बलात्कार' होत राहतील, नाहीतर पुरुषाचे मनस्वास्थ्य बिघडल्याचे परिणाम कुटुंबाला, समाजाला भोगावे लागतील. दोहोंपैकी कोणता दुष्परिणाम आपण पत्करायचा की दोन्ही थोडे थोडे सहन करायचे, हे पूर्णतः आपल्या नाकर्तेपणावर अवलंबून आहे. याबाबत टीव्हीवर वा अन्यत्र होणाऱ्या चर्चेत नेहमीच 'पुरुषाची मानसिकता बदलली पाहिजे' असं आवर्जून सांगितलं जातं. ती सूचना जरी रास्त असली तरी, त्याआधी पुरुषाची मानसिकता बिघडविण्याचे प्रयत्न थांबवायला नकोत का? त्याशिवाय ती मानसिकता बदलणार कशी ?

मग यावर उपाय काय? विवाह पद्धतच रद्द करायची का? तर याचे उत्तर 'नाही' असं द्यावं लागेल. यापेक्षा समाजाने स्वतःच्या करून घेतलेल्या नैतिकतेच्या कृत्रिम काटेकोर कल्पना थोड्या सौम्य आणि सैल करायच्या ठरवलं तरी

पुरुषांना मोकळा श्वास घेता येईल आणि त्याबरोबरीने स्त्रियांची, त्यांच्या अवहेलनेतून मुक्तता होण्यास सुरुवात होईल. विवाहाचं वय वाढल्यामुळे आणि वय वर्षे 15 ते 30 या कालखंडात कामभावना तीव्र असल्यामुळे, समजा मुला-मुलींमध्ये विवाहपूर्व शरीरसंबंध जर झालेच तर फार आकांडतांडव न करता त्याकडे बघण्याची दृष्टी 'सहज' होईल, असा प्रयत्न समाजाकडून हवा. ज्यावेळेस तरुण मंडळींना आपल्याला विवाहपूर्व हे स्वातंत्र्य मिळू शकते, त्यात काही विशेष साहस किंवा थ्रिल नाही, अशी खात्री वाटू लागेल, तेव्हा त्यातला चोरटेपणा लयास जाईल आणि अशा संबंधांचं प्रमाण आजच्या दडपलेल्या स्थितीत जितकं जास्त आहे, त्यापेक्षा ते आपोआपच कमी होत जाईल. कारण एकतर त्या संबंधांची जबाबदारी मुला-मुलींवर पडेल आणि दुसरे म्हणजे, एखादी गोष्ट करायला मिळणार नाही, या भावनेतून ती चोरून-मारून करून पहावीशी वाटण्याची भावनाच शिल्लक राहणार नाही. तरुणांच्या कामभावनेवर करडी नजर ठेवण्यापेक्षा मुलग्यांनी अधिक जबाबदारीने वागण्यासाठी काय करता येईल, इकडे समाजाने लक्ष दिलं पाहिजे. मुलींच्या शिक्षणावर आणि आर्थिक स्वातंत्र्याबाबत अधिक जागरूक राहिलं पाहिजे. लैंगिक शिक्षणाचा समाजाने सरकारकडे आग्रह धरला पाहिजे. संततीनियमनाचे आणि पालकत्वाचे शिक्षणही दिलं गेलं पाहिजे.

खरंतर, माणसाला त्याच्या स्थैर्यामुळे प्रगती साधता येत असते आणि हे स्थैर्य आपल्याला विवाह करण्यामधून मिळत असते. विशेषतः पुरुषांना मानसिक स्थिरतेसाठी विवाहाइतका चांगला पर्यायच नाही. विवाहाशिवाय मातृत्व मिळण्याचे वरदान स्त्रीला असल्यामुळे, मुलांच्या संगोपनाच्या जबाबदाऱ्या पार पाडताना तिला मानसिक एकग्रता साधता येऊन, ती आवश्यक ती स्थिरता मिळवू शकते. विवाह पद्धतीने गेल्या 3-4 हजार वर्षांत पुरुषांमध्ये खूप चांगले बदल आणलेले आहेत. पितृभावनेमुळे तो त्याच्या क्रूर मानसिकतेतून प्रेमळ पालकत्वाच्या भूमिकेत बदललेला आहे. तेव्हा विवाह पद्धत ही चूक नसून तिच्या पावित्र्याचे स्तोम करून विवाहपूर्व संबंधांना अडथळा करणे, त्यांना अनैतिक ठरविणे, इथे ती चूक आहे.

याबाबत पाश्चात्त्य प्रगत देशांनी या परिस्थितीला कसं तोंड दिलं ते मुद्दाम अभ्यासायला पाहिजे. भारतासारख्या जाती, धर्म, प्रदेश अशा भिंती तिथे नसल्यामुळे, आणि शैक्षणिक, आर्थिक समता तिथे बऱ्याच प्रमाणात असल्यामुळे, तिथे बदल आणणं भारताच्या तुलनेने खूप सोपं आहे. शिवाय शरीरशास्त्र, मानसशास्त्र याचा सांगोपांग अभ्यास तिथे झाल्यामुळे, जुन्या परंपरांना 'आमची उच्च संस्कृती' म्हणून डोक्यावर न घेता, तिथल्या समाजाने नव्या संशोधनानुसार पहिल्या प्रथम विवाहपूर्व संबंध मान्य केले. त्यासाठी लैंगिक शिक्षण आणि संतती नियमन शिक्षण चालू केलं. अशा संबंधांतून स्त्रीला मूल झाल्यास ते तिला एकटीला सांभाळता येणे शक्य व्हावे म्हणून स्त्रियांसाठी नवे कायदे व सुविधा तिथल्या सरकारांनी आणल्या. थिओडोर रुझवेल्ट सारखे प्रागतिक विचाराचे अध्यक्ष त्या काळात अमेरिकेला लाभले. 'मदर्स ओन्ली फॅमिली' ही कल्पना मध्यवर्ती धरून अमेरिकेमध्ये 1932 च्या काळात 'मदर पेन्शन लॉ' आणताना परित्यक्त मुले-मातांबरोबर अविवाहित मातांनाही त्यांच्या मुलांसमवेत सामील करून घेतलं गेलं. अमेरिकी समाजानेसुद्धा आणि त्यांच्या मुलांवर 'अनैतिक' असा शिक्का न मारता त्यांचा स्वीकार केला. साहजिकच स्त्रियांबद्दलच्या योनिशुचीतेच्या कल्पना आणि स्वतःच्या बीजाचे मूल किंवा कुळाला वारस अशा जखडलेल्या कल्पना पुरुषांना सोडून द्याव्या लागल्या. (यालाच पुरुषांमधील मानसिक बदल म्हणावे लागतील.) अशा प्रकारचे मुक्त संबंध किंवा 'लिव्ह इन रिलेशन' तिथे साधारणपणे वयाच्या चाळीशीपर्यंत सर्व स्त्री-पुरुषांमध्ये होत राहतात. पण म्हणून विवाहाचे महत्त्व ते कमी लेखत नाहीत. चाळिशी ओलांडणाऱ्या पुरुषांमध्ये (अपवाद वगळता) हळूहळू कामभावनेच्या हार्मोनचा प्रभाव किंवा जोर कमी होऊ लागतो. 15व्या वर्षांपासून पुढील वीस-पंचवीस वर्षे मुक्त जीवनाचा अनुभव घेतल्यानंतर

पाश्चात्त्य पुरुषांना प्रौढ जीवनात स्थैर्याची आस लागते. स्त्रियांनासुद्धा आपली मुले सांभाळण्यासाठी मदतीच्या गरजेतून पुरुषाची साथ हवीशी वाटते. मग त्यावेळी आपल्या आंतरिक सुरांशी सूर जुळणारे स्त्री-पुरुष एकत्र येऊन लग्न करतात. 'लिव्ह इन'चे पूर्वीचे अनुभव तेव्हा कामी येतात. अशा वेळेस त्या स्त्रियांची मुले लहान असल्यास त्यांच्यासह पुरुष त्यांचा स्वीकार करतो. विवाहानंतर या स्त्री-पुरुषांनी निष्ठेचे आयुष्य जगणे अभिप्रेत असते. कारण पाश्चात्य संस्कृतीत पती-पत्नीपैकी कोणीही दुसऱ्याला फसवून 'अफेअर' करणे, हे फार आक्षेपार्ह समजलं जातं, त्यापेक्षा घटस्फोट हा प्रामाणिक आणि उचित समजला जातो. म्हणूनच प्रौढविवाह जेव्हा विचारपूर्वक होतात, तेव्हा ते टिकवण्याचा प्रयत्न तिथे जास्त असतो.

अशा रीतीने विवाहपूर्व स्त्री-पुरुष संबंधांबाबत नैसर्गिक दृष्टिकोन स्वीकारल्यानंतर युरोप-अमेरिकेतील पहिल्या तरुण पिढीला आणि त्यांच्या पालकांच्याही पहिल्या पिढीला जुन्या नैतिक मानल्या गेलेल्या परंपरा सोडतांना अडचणी आल्या, त्यांच्या चिंता वाढल्या. पण सुमारे वीस वर्षांनी त्याचे चांगले परिणाम दिसून येऊ लागले. याचा अर्थ युरोपात आता कोणतेच गुन्हे नाहीत किंवा प्रत्येक कुटुंबात अगदी आलबेल आहे, असं नाही. परंतु लैंगिकगुन्हे, त्यांची वारंवारता, आणि त्यासंदर्भातील सामाजिक विकृती याचे प्रमाण तिथे खूप घटलेले आढळते. स्त्री शरीराचे आकर्षण असणे आणि म्हणून त्यातून त्यांची छेडछाड करण्याचा आनंद घ्यावासा वाटणे, असे वास्तव तिथे दिसत नाही, ते मुक्त स्त्री-पुरुष संबंधांच्या मान्यतेमुळे, असे आता म्हणावे लागेल. मुक्त शरीर संबंधांचा परवाना अगदी तरुण वयातच त्यांना उपलब्ध झाल्यामुळे, विवाहानंतर प्रथमच मुलगे-मुली शरीरसंबंधांना सामोरे जात आहेत, असेही तिथे नाही आणि मग इतके वर्ष मी कामपूर्तीपासून वंचित आहे, तेव्हा घाईने आणि कशाही प्रकारे तो आनंद मी आता मिळवीन, अशी परिस्थिती तिथे आता राहिलेली नाही. आधीच्या संबंधांच्या अनुभवातून आणि सेक्स एज्युकेशनमुळे स्त्री-पुरुषांनी एकमेकांचा सन्मान करण्याचे महत्त्व त्यांना समजलेले असते. त्यामुळे विवाह हे नाते तिथे असे उरलेले नाही की शरीरसंबंधाबाबत सरसकटपणे ते जबरदस्तीचे किंवा अन्यायाचे 'ना हरकत प्रमाणपत्र ' म्हणून वापरले जावे.

भारतात 'लिव्ह इन' द्वारे असे विवाहपूर्व संबंध उच्च शिक्षित किंवा उच्च आर्थिक वर्गात चालू झालेले आहेत. पण एकूण समाजात शैक्षणिक, आर्थिक, जातीय आणि स्त्री-पुरुष विषमता तीव्र असल्यामुळे असे विवाहपूर्व संबंध मान्य होण्यात खूप अडचणी आहेत, हेही तितकंच खरं!

लोकसत्ताच्या सौजन्याने(30 मे 2015)

*mangala_samant@yahoo.com*

•••

# आपली बाजू नेमकी कोणती?

*डॉ. हमीद दाभोलकर*

श्रद्धा-अंधश्रद्धा....समाज.....जात-धर्म.....

मुंबईच्या स्वामीनारायण मंदिरातील कार्यक्रमामध्ये एका महिला पत्रकाराला रीतिरिवाजांचा दाखला देत पहिल्या रांगेमधून उठायला सांगितल्याची घटना काही दिवसांपूर्वीच घडली. त्यामुळे धर्माच्या नावावर चालणारी स्त्री-पुरुष असमानता आणि भारतीय राज्यघटनेने दिलेले स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य पुन्हा एकदा समोरासमोर उभे ठाकले. खरे तर ह्या संघर्षाचा आपल्या देशात मोठाच इतिहास आहे. अगदी देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान असताना इंदिरा गांधींनादेखील जगन्नाथ पुरीच्या मंदिरामध्ये अशाच प्रसंगाला सामोरे जावे लागले होते. वर्तमानाचा कानोसा घ्यायचा झाला तर स्त्री-पुरुष समतेच्या बाबतीत इतर क्षेत्रांमध्ये आपण प्रगती केलेली असली तरी भारतात अजून अशी असंख्य मंदिरे आहेत की जिथे महिलांना गाभाऱ्यात प्रवेश नाही.

भारतीय संविधानाची साठी ओलांडून गेल्यानंतरसुद्धा अशा घटना आपल्याकडे अजून का घडतात ह्याची कारणमीमांसा आपण जर करू लागलो तर धर्माने स्त्रीला दिलेल्या दुय्यम स्थानापाशी आपण येऊन पोहोचतो. जवळ जवळ सर्वच धर्मांनी स्त्रीला दुय्यम स्थान दिलेले आहे. इस्लामने तीन वेळा तलाक उच्चारून विवाहित स्त्रीला काडीमोड देण्याची सोय ठेवली आहे. इतकेच नाही, तर त्या स्त्रीला पोटगीचा अधिकारदेखील नाकारला आहे. यहुदी धर्माची आज्ञा अशी सांगते की, 'जेवताना भाकरी करपली तर पत्नीला सोडचिठ्ठी द्यावी.' हिंदू धर्मातील मनुस्मृतीमध्ये असे लिहिले आहे की, पती व्यसनी, जुगारी, वेश्यागमनी कसाही असला तरी स्त्रीने त्याच्या आज्ञेत राहावे. ख्रिश्चन धर्माच्या मते पुरुषाच्या जन्मानंतर केवळ त्याच्याचसाठी स्त्रीची निर्मिती झाली आणि तीदेखील पुरुषाच्या बरगडीपासून. आणखी इतर धर्मांमध्येही आपल्याला अशा अनेक गोष्टी पाहायला मिळतात. त्या उघडपणे पुरुषसत्ताक समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या तसेच स्त्री-पुरुष भेदभावाचे समर्थन करणाऱ्या आहेत. असे असतानादेखील आधुनिक मूल्यांचा स्वीकार करून स्त्री-पुरुष समानतेच्या बाजूने भूमिका घेण्याचे आपल्यापैकी बहुतांश लोक का टाळतात हा कळीचा मुद्दा आहे.

जर हा गुंता सोडवायचा असेल तर हे मान्य करण्यावाचून गत्यंतरच नाही की, आपण जन्माने कुठल्याही धर्माचे असू, आपल्या धर्मामध्ये जे कालबाह्य झाले आहे ते मागे टाकले पाहिजे. पण जागतिक पातळीवर भारतासकट अनेक ठिकाणी धर्माचे कट्टरीकरण होत असताना आणि विधायक कृतिशील धर्मचिकित्सेचा आग्रह धरणाऱ्या लोकांचे गोळ्या घालून खून होत असताना हे कसे घडू शकेल, अशी शंका कुणाच्याही मनामध्ये येऊ शकते. आपल्याला जर खरेच आधुनिक माणूस बनायचे असेल तर आपले बाह्यरंग आधुनिक होऊन कसे चालेल? आपल्या धारणा आणि मूल्ये आधुनिक व्हायला नको का?

धर्म ही आपल्या समाजातील बहुतांश लोकांच्या जीवनातील सर्वात मोठी धारणा असते; पण अडचण अशी आहे की, ही धारणा चिकित्सेच्या प्रांगणात आणलेली आपल्याला आवडत नाही. विधायक धर्मचिकित्सेचा आग्रह जर कोणी धरू लागले तर मात्र अनेकांचे पित्त खवळते. चिकित्सेचा आग्रह धरणाऱ्या व्यक्तीची आपण निंदा करू लागतो, निंदा

करून ते थांबले नाहीत तर त्यांना धर्मद्रोही ठरवतो. तुम्हाला आमच्याच धर्मातील त्रुटी दिसतात असे म्हणून त्यांच्याशी भांडतो. ह्यातून स्वत:च्या धारणा आणि मूल्ये ही आधुनिक होण्याच्या मार्गातील आपण स्वत:च अडथळा बनत असतो हे अनेकांच्या लक्षातदेखील येत नाही. खऱ्या धर्माला चिकित्सेचे वावडे असण्याचे काही करणच नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायम ह्या बाबतीत खऱ्या सोन्याला आगीचे भय नसते हे उदाहरण द्यायचे. जर अग्निपरीक्षेत धातू जाळून गेला तर ते सोने नसल्याचे सिद्ध झाल्याने दु:ख करण्याचे काही कारणच उरत नाही. जर ते खरेच सोने असेल तर ते आगीमध्येदेखील तावून-सुलाखून निघेल. म्हणून आपण चिकित्सेला घाबरता कामा नये.

आपण जर योग्य मूल्यांचा आग्रह धरून उभे राहिलो तर समाज ती मूल्ये स्वीकारू लागतो. कदाचित थोडा वेळ लागेल, काही किंमत मोजावी लागेल. पण समाजाची धारणा निश्चित करणारे प्रमाणमूल्य बदलू लागते. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने वीस वर्षांपूर्वी केलेल्या शनिशिंगणापूरच्या सत्याग्रहाचे उदाहरण बोलके आहे. शनिशिंगणापूरच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश मिळावा म्हणून बाबा आढाव, एन. डी. पाटील, पुष्पाताई भावे, श्रीराम लागू ह्यांच्यासोबत डॉ. दाभोलकरांनी सत्याग्रह केला. त्या वेळेच्या सामाजिक न्यायमंत्र्यांनी *श्रद्धेला हात घालणाऱ्या दाभोलकरांना लाथाबुक्क्यांनी तुडवले पाहिजे*, असे जाहीर विधान केले होते. भाजप-शिवसेनेने उघड आणि काँग्रेसने छुपा विरोध केला होता. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे आंदोलन झाले, त्यामुळे समाजात घुसळण झाली. वास्तवातील चित्र अजून बदलले नसले तरी ही लढाई अयशस्वी पण झाली नाही. प्रत्यक्षात अजूनही शनिशिंगणापूरच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश नाही. याविषयीची महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची जनहित याचिका न्यायालयात प्रलंबित आहे. असे असले तरी एक महत्त्वाचा बदल मात्र नक्कीच झाला. ज्या पक्षांनी ह्या आंदोलनाला विरोध केला होता त्याच पक्षांनी कोल्हापूरला महालक्ष्मीच्या मंदिरातील गाभाऱ्यात महिलांना प्रवेश मिळावा म्हणून आंदोलन केले आणि स्वामीनारायण मंदिरात स्त्री-पुरुष भेदभाव करण्याच्या प्रथेविषयी मुख्यमंत्र्यांना जाहीर नाराजी व्यक्त करावी लागली. भले अनेक वर्षांनी का होईना, समाजाचे ह्या बाबतीत विचार करण्याचे प्रमाणमूल्य योग्य दिशेने बदलते आहे अशी आशा निर्माण करणाऱ्या ह्या गोष्टी आहेत. मात्र, या गोष्टींमुळे स्त्री-पुरुष विषमतेची धर्माने पाठराखण करण्याचे चित्र बदलण्याच्या दृष्टीने प्रगतीचे केवळ एकच पाऊल पुढे पडले आहे. अजून बरीच मजल आपल्याला गाठायची आहे. त्यासाठी धर्माच्या नावावर चालणारी स्त्री-पुरुष असमानता आणि भारतीय राज्य घटनेने दिलेले स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य ह्यांच्या लढाईत आपण कोणत्या बाजूने उभे राहणार हे ठरवायला लागणार आहे. धर्मातील चुकीच्या गोष्टी गळून पडल्याने धर्म धोक्यात येत नाही, तर उन्नत होतो ही धारणा मनामध्ये ठेवून चांगल्या बदलाला पाठिंबा देण्याची निर्भय भूमिका आज प्रत्येकानेच घेण्याची गरज आहे. अशी पुरोगामी मनोभूमिका तयार झाली तर केवळ मंदिरांच्या ठिकाणी महिलांना प्रवेशासंदर्भातच नाही, तर कोणत्याही धर्माच्या नावावर होणारी विविध प्रकारची स्त्री-पुरुष असमानता आपण नष्ट करू शकू. फक्त त्यासाठी आवश्यकता आहे मनोनिर्धाराची...

दिव्यमराठीच्या सौजन्याने (13 मे 2015)

*hamid.dabholkar@gmail.com*

•••

# लेखकाचा मृत्यू

*विश्राम गुप्ते*

मानसिकता.....माध्यम.....समाज.....

सगळी माणसं मरणाधीन असतात, लेखकसुद्धा माणूस आहे म्हणून तो मरणाधीन आहे. हे लॉजिक आज सांगायचं कारण म्हणजे सध्या साहित्यक्षेत्रात लेखकाचं मरण ह्या विषयावर चर्चा सुरू आहे. मीडिया, मार्केट आणि मनी ह्या साहित्यबाह्य प्रभावांचा साहित्यावर कसा प्रभाव पडतो, हे ह्या पूर्वी आपण बघितलं आहे. अखेरीस मरणाची हूल आणि साहित्याचा परस्परसंबंध काय असू शकतो हे बघू या.

श्री. पेरुमल मुरुगन ह्या तमिळ कादंबरीकाराने 7 जानेवारी 2015 रोजी स्वतःचा लेखक म्हणून मृत्यू जाहीर केला. ह्यापुढे आपण फक्त एक शिक्षक म्हणून जगू, लेखक म्हणून नाही अशी मुरुगन ह्यांनी सोशल नेटवर्किंग साइटवरून घोषणा केली. ही बातमी व्हायरल झाली आणि कालपर्यंत अनोळखी असलेले मुरुगन प्रकाशात आले. मुरुगन ह्यांच्या कादंबरीमुळे गावाची बदनामी झाली, असं त्यांच्या गाववाल्यांचं म्हणणं आहे. त्यासाठी मुरुगन ह्यांनी गाववाल्यांना माफीपत्र लिहून दिलं.

बदललेल्या राजकीय वातावरणात अतिसांस्कृतिकतावाद्यांना 'अच्छे दिन' आले आहेत. त्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आले, अशी भीती आज साहित्यिकांना भेडसावतेय. त्यात मुरुगन प्रकरणाने भर घातली. जो समाज आपल्या पौराणिक, धार्मिक, ऐतिहासिक आणि राजकीय परंपरेची निर्भय चिकित्सा करत नाही, तो गोठून जातो. जो करतो त्याचं नागरी जीवन झऱ्यासारखं वाहतं, हे पाश्चात्य देशांनी सिद्ध केलं. म्हणून तिथे उठसूट पुस्तकांविरुद्ध फतवे निघत नाहीत आणि लेखकांना 'मरावं' लागत नाही. युरोप-अमेरिकेत परंपरानिष्ठांची संख्या नगण्य नाही, पण तिथे अभिव्यक्ती स्वातंत्र्याची कल्पना रुजली आहे.

मुरुगन ह्यांचा माफीनामा मीडियात शोभेल असा नाटकी वाटतो. शरणागतीचा त्यांचा पवित्रा तमिळ चित्रपटात शोभेल, असा अतिरंजित आहे. 'ह्या पुढे मी कधीच लिखाण करणार नाही, माझी पूर्वीची सगळी पुस्तकं जाळून टाका' अशी भडक भाषा ते वापरतात. कोणी दरडावलं की चूप बसणं हे साहित्यिकाला शोभत नाही. त्यामुळे मुरुगन ह्यांचा उद्देश नेमका माफी मागणं आहे, स्वतःसाठी सिंपथी वेव्ह निर्माण करणं आहे की आपल्या विरोधकांना एक्स्पोज करणं, हे कळत नाही.

हे प्रकरण समजावून घेताना सर्वव्यापी प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचं आजच्या जगण्यातलं स्थान मान्य करावं लागतं. मुरुगन ह्यांच्यावर रोष दाखवणारे अतिसांस्कृतिकतावादी गट आणि ह्या रोषासमोर नांगी टाकणारे मुरुगन, दोघंही मीडियाच्या प्रभावक्षेत्रात येतात. ह्यापुढे मुरुगन म्हणतात तसं खरोखरच लोक त्यांची पुस्तकं जाळतील की त्यांची विक्रमी खरेदी करतील, हे बघावं लागेल. मीडियातून जाहीर केलेलं हे मरण मुरुगन ह्यांना कदाचित, एक लेखक म्हणून संजीवनी देऊ शकेल. हाच मीडियाचा गमतीदायक विरोधाभास आहे.

मीडियातून मरणाची हूल दिलेले मुरुगनसारखे लेखक नव्या जोमाने जगतात, तर जोमदार लेखक मीडियामुळे मरू शकतात. ह्याचं एक उदाहरण म्हणजे 'तेहेलका'चे पूर्व संपादक, 'द अल्केमी ऑफ डिझायर' ह्या खळबळजनक

इंग्रजी कादंबरीचे लेखक श्री. तरुण तेजपाल. सेक्युलर-लिबरल विचारधारा मानणारे, आपल्या वृत्तपत्रातून उजव्या विचारसरणीचा सातत्याने विरोध करणारे तेजपाल जगण्याची ईर्षा असलेले महत्त्वाकांक्षी भारतीय इंग्रजी लेखक आहेत. त्यांच्यावर लैंगिक छळाचा आरोप होताच त्यांचा मूळ मानवी स्वभाव उसळी मारून वर आला आणि त्यांच्यातला लेखक जायबंदी झाला. स्वतःच्या बचावासाठी त्यांनी जे केलं ते त्यांच्या अंगलट आलं. ज्या मीडियाने त्यांना मोठा लेखक केलं, त्याच मीडियाने त्यांना शेवटी मारलं.

मुरुगन मरणाची घोषणा करून जिवंत आहेत, तर लढवय्ये तेजपाल एक लेखक म्हणून आज मरणोन्मुख झाले आहेत. उद्या जर सुनंदा पुष्कर केसमध्ये नवं काही उघडकीस आलं, तर 'द ग्रेट इंडियन नॉव्हेल'सारखी पोस्टमॉडर्न कादंबरी लिहिणारे शशी थरूरसुद्धा लेखक म्हणून मरून जाऊ शकतात. तरुण तेजपाल काय किंवा शशी थरूर काय, दोघंही अत्यंत प्रभावी वक्ते आहेत. त्यांचा मीडियावरचा वावर अजिंक्य वाटायचा. आज ते ह्याच मीडियामुळे पुरते गारद झालेले वाटतात. मीडियामुळे अप्रसिद्ध लेखक प्रसिद्ध होतात आणि प्रसिद्ध लेखक कुप्रसिद्ध. मीडिया न्यूट्रल आहे. तिला लेखकात नाही तर, बातमीत इंट्रेस्ट आहे.

मुरुगन ह्यांची स्वतःच्या मरणाची केलेली घोषणा आणि 1989 साली इराणी धर्मगुरू आणि अध्यक्ष अयातुल्ला खोमेनी ह्यांनी सलमान रश्दी ह्या लेखकाच्या मृत्यूदंडाचा प्रसारित केलेला फतवा ह्यात मोठा फरक आहे. मुरुगन ह्यांच्या घोषणेला रूपकात्मक आत्महत्या म्हणता येतं, तर रश्दींविरुद्धच्या खोमेनींच्या फतव्याला खुनाची सुपारी म्हणता येईल. ह्या सुपारीमुळे रश्दींवर सुमारे दहा वर्षं उंदरासारखं बिळात लपून राहण्याची पाळी आली, आणि रश्दींच्या विवाद्य पुस्तकाशी संबंधित असलेल्या एकूण 60 व्यक्तींना मरण पत्करावं लागलं. अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी इतक्या जास्त माणसांना मरावं लागण्याचं, हे पहिलंच उदाहरण असावं. 'शार्ली हेब्दो'साठी मेलेली माणसं त्यापेक्षा कमी आहेत.

फतव्याच्या काळात रश्दींच्या जीवाचं बरंवाईट होऊ नये, म्हणून ब्रिटिश सरकारने रश्दींना चोवीस तास 'झेडप्लस' सिक्युरिटी दिली होती. हा खर्च ब्रिटिश सरकारने का करावा? असा प्रश्न तेव्हा काही ब्रिटिश लोकांनी विचारला होता. व्यक्तिवादी लेखकाच्या कल्पना विलासाची किंमत समाजाने का चुकवावी? असा प्रश्नकर्त्यांचा रोख होता. रश्दींच्या 'जोसेफ अंतोन' ह्या फतव्याविषयीच्या आठवणींच्या पुस्तकात रश्दींना सुनावल्या गेलेल्या देहदंडाचा जागतिक राजकारणावर कसा प्रभाव पडला हे कळतं. आज रश्दी जिवंत आहेत ह्याचं एक कारण म्हणजे तत्कालीन ब्रिटिश सरकारने त्यांना पूर्ण दहा वर्षे पूर्ण चोवीस तास संरक्षण दिलं हेच आहे. रश्दींसारख्या एका लेखकाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश सरकारने अक्षरशः लाखो पाऊंड्स खर्च करून अभिव्यक्ती स्वातंत्र्याची किंमत मोजली आहे.

मुरुगन ह्यांची स्वतःच्या प्रतीकात्मक मृत्यूची घोषणा किंवा रश्दींना सुनावलेला मृत्यूदंड ह्या तुलनेत सफदर हश्मी ह्या भारतीय लेखकाचा त्याच्या विरोधकांनी केलेला खून अधिक भयंकर आहे. हश्मी हे मार्क्सवादी पक्षाचे सभासद, पथनाट्यकार आणि लेखक होते. 1 जानेवारी 1989 रोजी दिल्लीजवळ एका गावात पथनाट्य करताना त्यांच्यावर काँग्रेस विरोधकांनी सशस्त्र हल्ला केला. त्यात सफदर हश्मींचा प्राण गेला. ह्या हल्ल्यात हश्मींसोबत रामबहादूर नावाचा सामान्य कामगारसुद्धा मारला गेला होता. पण ह्याची दखल फार कोणी घेतली नाही. सामान्य माणसांच्या तुलनेत लेखकाचा प्राण अधिक मोलाचा असतो का? हा प्रश्न तेव्हा उपस्थित झाला होता. आजही ह्या प्रश्नातली बोच कमी झालेली नाही.

पूर्वी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारी माणसं प्रतीकात्मकतेने आपला निषेध नोंदवत असत. तेंडुलकरांच्या नाटकांमुळे क्षुब्ध झालेले कर्तारसिंग थत्ते ऐंशीच्या दशकात हातात छडी घेऊन तेंडुलकरांना छडीचा प्रसाद देऊन आले होते. सनातन्यांनी तेंडुलकरांना घेरलं होतं, पण त्यामुळे, मुरुगनसारखा त्यांनी स्वतःचा मृत्यू जाहीर केला नाही. उलट एका प्रसंगी त्यांनी बंदूक घेऊन त्यांच्या शत्रूला मारण्याची गोष्ट केली होती!

ज्या हिंसक रीतीने परंपरावादी समाज अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करतात ते बघता छडीचा प्रतीकात्मक प्रतिसाद देणारे कर्तारसिंग थत्ते आज परवडले असते असं वाटतं. बहुसंपर्कशील समाजात संपर्कयंत्रणा वाढते. मीडियाचं जाळं तयार होतं. प्रत्येक व्यक्तीला आणि गटाला स्वतःचं मत मांडण्याचं स्वातंत्र्य मिळतं आणि वादप्रतिवादाचा गदारोळ सुरू होतो. पण हा गदारोळ अमर्त्य सेन ज्याला 'द आर्ग्युमेंटेटिव्ह इंडियन' म्हणतात अशा भारतीयांचा नसतो, तर तो माझंच खरं, दुसऱ्याचं खोटं हा अट्टाहास करणाऱ्या अतिसांस्कृतितावाद्यांचा असतो.

लेखकाच्या जीवावर उठणारा सांस्कृतिक दहशतवाद हा फक्त वर्षा-सहा महिन्यातला ट्रेंड नाही. परंपराप्रिय भारतात तो शेकडो वर्षांपासून नीट रुजलेला आहे. धर्म-श्रद्धेची कुठलीही चिकित्सा मान्य नसलेल्या धर्मप्रिय, कर्मकांडनिष्ठ, परंपराभिमानी भारतात चिकित्सक विचार मरणोन्मुख अवस्थेत आहे. इथे अंधश्रद्धा, भोळीभक्ती, कौटुंबिक परंपरेची दहशत आणि पोथीनिष्ठा इतकी खोल रुजलेली आहे की त्यांची चिकित्साच अशक्य वाटावी. त्यात भर म्हणजे बहुतेक भारतीय लेखक परंपरेच्या चिकित्सेपेक्षा तिचं रोमँटिक वर्णन करत सुटतात. हा गर्दीचा अनुनय खूप लेखक करतात. जे करत नाहीत, त्यांना मरणाच्या धमक्यांना तोंड द्यावं लागतं. काहींना छड्या खाव्या लागतात. काहींना स्वतःचं मरण घोषित करावं लागतं. सफदर हश्मींसारख्या लेखकाला प्रत्यक्ष मरावं लागतं.

भारतासारख्या उतरंडप्रिय देशात केवळ माणूस म्हणून जगण्याचं स्वातंत्र्य मोठ्या लोकसंख्येला नाकारलं गेलं आहे. दलित, आदिवासी, भटक्या आणि विमुक्तांचे मानवी अधिकार जिथे नाकारले जातात तिथे लेखकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याला किती महत्त्व द्यायचं? हा प्रश्न कार्यकर्त्यांना विचारणं आवडतं. ह्याचं एक उत्तर: भटक्या विमुक्तांना जसं प्राथमिक शिक्षणाचं महत्त्व, तसं लेखकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचं महत्त्व. कारण दोन्ही घटक मानवी समाजाचा भाग आहेत, आणि दोन्हींची प्रतिष्ठा जपणं संस्कृतीचं काम आहे. एरवी कोणी अमर नाही. सगळी माणसं मरणाधीन असतात, लेखकसुद्धा माणूस आहे म्हणून तो मरणाधीन आहे.

महाराष्ट्र टाइम्सच्या सौजन्याने

*contactus@sangath.com*

•••

# मराठी नियतकालिकांची हतबलता

*राम जगताप*

माध्यम....मानसिकता....चळवळ....

सलग 20 हून अधिक दिवस पुण्याच्या ‘एफटीआय’मधील विद्यार्थ्यांचे नव्या संचालकांविरोधातले आंदोलन तग धरून आहे. त्यातून इतर काही निष्पन्न होईल न होईल; पण एक गोष्ट सिद्ध व्हायला हरकत नाही की, आपल्यावरील अन्यायाला आंदोलनाच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे दिवस अजूनही पूर्णपणे इतिहासजमा झालेले नाहीत; पण ही मिणमिणती पणती म्हणावी,

तशा प्रकारची अंधूक आशादायक घटना आहे. कारण महाराष्ट्रातल्या सामाजिक क्षेत्रातल्या, कलाक्षेत्रातल्या आणि साहित्यक्षेत्रातल्या चळवळी जवळपास संपल्यात जमा आहेत. या क्षेत्रातील मान्यवर संस्था-संघटना यांनाही मरगळ आली आहे. सुशिक्षित, बुद्धिजीवी (हल्ली यांनाच 'बुद्धिवादी' म्हणण्याची/समजण्याची प्रथा पडली आहे.) मध्यमवर्गीयांच्या दृष्टीने साहित्य-कला हे विषय, विशेषत: नियोजनपूर्वक वेळ देऊन वाचन या गोष्टी बिनमहत्त्वाच्या होऊ लागल्या आहेत. त्यामुळे हा सगळा अनर्थ ओढवला आहे, असं एक आकलन हल्ली अनेक मान्यवर मांडत असतात. त्यात काही प्रमाणात तथ्यही आहे, नाही असं नाही; पण ते एकमेव कारण आहे, असं मात्र निश्चित म्हणता येणार नाही.

**नियतकालिकांची शोचनीय अवस्था**

मराठीतल्या नियतकालिकांची अलीकडच्या काळात शोचनीय म्हणावी इतकी वाईट स्थिती झाली आहे. त्यांची वाचकसंख्या रोडावत चालली आहे. त्यांचे वर्गणीदार वाढते नाहीत. नवे वर्गणीदार मिळवण्यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करत आहेत; पण त्यात म्हणावं तसं यश येत नाही. आकर्षक योजना, सवलत योजना, बक्षिसं देऊनही नव्याने मिळालेले वर्गणीदार टिकत नाहीत. त्यांचं आर्थिक भांडवलही तुटपुंजं असल्याने त्यांच्या प्रयत्नांना मर्यादा पडतात.

तुटपुंज्या वर्गणीदारांच्या संख्येवर अंकाचं अर्थकारण चालू शकत नाही आणि अंकाचा खप मर्यादित असल्याने जाहिराती मिळायलाही अडचणी येतात. दुसरीकडे अंकाच्या निर्मितीचा खर्च वाढतो आहे. अशा परिस्थितीत मराठीतल्या अनेक मासिकांना महाराष्ट्र राज्य सरकारच्या साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून मिळणारं अनुदान आणि भारतीय टपाल खात्याकडून अंक पाठवण्यासाठी मिळणारी सवलत, हाच काय तो आधार उरला आहे; पण साहित्य आणि संस्कृती मंडळाचं अनुदान अतिशय तुटपुंजं असतं. 'अंतर्नाद'सारख्या मासिकाला वर्षाला फार तर 40 हजार रुपये अनुदान दिलं जातं. त्यातून त्यांचा जेमतेम एकच अंक निघतो. हे मंडळ महाराष्ट्रातील 30-35 मासिकांना अशा प्रकारे अनुदान देतं. ती चांगलीच गोष्ट आहे; पण त्याचा आकडा फारच तोकडा असल्याने त्यातून म्हणावा तसा परिणाम साधला जात नाही. मराठीतल्या मासिकांना कालपरवापर्यंत दुसरा मोठा आधार होता तो, भारतीय पोस्ट खात्याचा. अंक पोस्टाने पाठवण्यासाठी रजिस्ट्रेशन केल्यानंतर या मासिकांना भरपूर सवलत मिळते. अंक पाठवण्यासाठी वजनानुसार 25 पैसे, 50 पैसे आणि एक रुपया असा अधिभार पोस्टखात्याकडून आकारला जातो. दर आठवड्याचे, पंधरवड्याचे वा महिन्याचे चार-दोन हजार अंक पाठवण्यासाठी हा खर्च तसा खूपच कमी आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हजारभर नियतकालिकांना त्याचा मोठा आधार होता; पण गेल्या काही वर्षांत पोस्ट खात्याकडून या नियतकालिकांची मोठ्या प्रमाणावर अडवणूक केली जात आहे. त्यामुळे त्यांच्यासमोर मोठं नवंच उभं ठाकलं आहे. काय होतं आहे नेमकं?

**पोस्ट खात्याला आलेली अवकळा**

गेल्या काही वर्षांत पोस्ट खात्याकडून आपल्याला येणाऱ्या पत्रांमध्ये, नियतकालिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. याचं कारण पाहू गेल्यास असं दिसतं की, पोस्ट खात्यालाच अवकळा आली आहे. केंद्र सरकारने या खात्याची अतोनात हेळसांड चालवली आहे. या खात्यातली माणसं निवृत्त झाली की, त्यांच्या जागी नव्या नेमणुका केल्या जात नाहीत. नवी भरती तर पूर्णपणे बंद केली आहे. त्यामुळे उर्वरित पोस्टमनवर कामाचा प्रचंड ताण येतो. एकाच पोस्टमनला रोज दहा-बारा किलोमीटर फिरायला सांगितलं जातं. ते कुणाही माणसाला शक्य नसतं. त्यामुळे पोस्टमन त्रासून गेले आहेत. त्याचा परिणाम त्यांच्या कामावर होतो आहे. याची अगदी वरपर्यंत चौकशी केल्यावर

समजतं की, या परिस्थितीवर सध्याच्या घडीला कुठलाच सकारात्मक उपाय पोस्ट खात्याला करता येत नाही. कारण केंद्र सरकारच्या दृष्टीने हे खातं बेदखल झालं आहे. त्यामुळे सरकारकडून कुठल्याही प्रकारचं साहाय्य, मदत, सेवा-सुविधा पुरवल्या जात नाहीत. आहे त्या स्थितीत काम करायला सांगितलं जात आहे. अशा परिस्थितीत कोणता उपाय उरतो?

तर जेवढं शक्य, तेवढं करायचं, बाकीचं बाजूला टाकायचं. पोस्टमन नेमकं तेच करत आहेत. आपल्यापैकी अनेकांच्या लक्षात आलं असेल की, अलीकडच्या काळात नित्यनेमाने दिसणारा पोस्टमन आता कधीतरीच दिसतो. चार-पाच दिवसांतून एकदा त्याचं दर्शन झालं तरी खूप. बऱ्याचदा तो आठवडा-आठवडा दिसतही नाही. याचं कारण, आता कुणी एकमेकांना पत्र लिहीत नाही, कुणी मनिऑर्डर पाठवत नाही. हल्ली शुभेच्छा कार्डही पाठवली जात नाहीत. लहान मुलांच्या वाढदिवसांपासून लग्नाच्या वाढदिवसांपर्यंत आणि दिवाळीपासून नववर्षापर्यंतच्या सर्व सणांच्या निमित्ताने दिल्या-घेतल्या जाणाऱ्या शुभेच्छांसाठी कुणी पोस्टाचा आधार घेत नाही. फेसबुक-वॉट्सअॅप-मोबाइल त्यापेक्षा जास्त जलद आणि सोयीचे ठरतात. यामुळे पोस्ट खात्याला अवकळा आली, असं आपण समजतो; पण खरा प्रकार असा नाही. अजूनही अनेक प्रकारची नियतकालिकं, कार्यालयीन पत्रव्यवहार आणि इतर बराचसा पत्रव्यवहार पोस्टामार्फतच होतो; पण एकंदर पत्रव्यवहार कमी झाला आहे, ही खरी गोष्ट आहे. अलीकडच्या काळात पोस्टाने वेगवेगळ्या योजना राबवून, बचतीच्या योजना आखून स्वत:ला टिकण्याचे वेगळे पर्याय शोधलेले आहेत; पण दैनंदिन बटवडा कमी झाला आहे, हेही तितकंच खरं.

याचा सर्वात मोठा परिणाम झाला आहे तो मराठीतल्या नियतकालिकांवर. कारण पोस्ट खात्याकडे असलेलं मनुष्यबळ आणि त्यांच्याकडे येणारा रोजचा पत्रव्यवहार यांचं प्रमाण पूर्णपणे व्यस्त आहे. कामाचा डोंगर रोज उभा राहतो; पण तो उपसायला माणसं आणणार कुठून? त्यामुळे पोस्ट खात्याकडून सरळ-सोपा मार्ग अवलंबला जातो. तो म्हणजे, जे फारसं महत्त्वाचं नाही, ते सरळ बाजूला टाकलं जातं. याचा पहिला फटका मराठी नियतकालिकांना बसतो. कारण या नियतकालिकांचे अंक 15 दिवसांनी दिले काय आणि महिन्याने दिले काय, त्यामुळे कुणाचंही फारसं नुकसान होत नाही, असा पोस्ट खातं विचार करतं. त्यामुळे ही नियतकालिकं पोस्ट खात्यातच सरळ बाजूला काढली जातात आणि महिन्यातून कधीतरी एकदम वाटली जातात. दुसरी गोष्ट अशी की, पोस्टात फारसे कर्मचारीच नसल्याने या नियतकालिकांवर तिकिटं लावण्याचं कामही आता त्या त्या नियतकालिकांच्याच माणसांनाच करायला सांगितलं जातं. *अंकावर रजिस्ट्रेशन क्रमांकच छापलेला नाही, यावेळी अंकाची वाढलेली पानेच आगाऊ सांगितलेली नाहीत, अंक वेळेवरच आणले नाहीत, अंकावर पृष्ठसंख्याच टाकली नाही,* अशा बारीकसारीक गोष्टींवरून अडवणूक करायचा प्रयत्न केला जातो. जेणेकरून पोस्टाच्या या जाचाला कंटाळून ही नियतकालिकं वेगळा पर्याय शोधतील, असा त्यामागचा होरा आहे.

**रोडावत असलेली वर्गणीदारांची संख्या**

पोस्ट खात्यापुढे दुसरा पर्याय नसल्याने त्यांनी हा सोयीचा मार्ग अवलंबला असला, तरी तो या नियतकालिकांसाठी गैरसोयीचा ठरत आहे. कुठलाही वर्गणीदार असा विचार करतो की, मला पैसे भरूनही अंक वेळेवर मिळत नसतील, तर त्याचा काय उपयोग? मग, तो एकदा वर्गणी संपली की, पुन्हा तिचं नूतनीकरण करत नाही. यामुळे मराठीतल्या अनेक नियतकालिकांच्या वर्गणीदारांची संख्या रोडावत चालली आहे. ‘रूपवाणी’, ‘मराठी संशोधन पत्रिका’, ‘अंतर्नाद’, ‘मसाप पत्रिका’, ‘साहित्य’, ‘पंचधारा’, ‘युगवाणी’, ‘आजचा सुधारक’, ‘पालकनीती’, ‘मिळून

साऱ्याजणी', 'परिवर्तनाचा वाटसरू', 'भाषा आणि जीवन', 'नव अनुष्टुभ', 'आपलं पर्यावरण', 'वनराई', 'सत्याग्रही विचारधारा', 'साहित्य सूची', 'ललित', 'समाज प्रबोधन पत्रिका', 'नवभारत', 'प्रतिष्ठान', 'आपले जग', 'शेतकरी संघटक', 'माहेर', 'मेनका', 'जडण-घडण', 'वसंत', 'अर्थबोधपत्रिका', 'साप्ताहिक साधना', 'श्री व सौ', 'विकल्पवेध', 'व्यापारी मित्र', 'पुरुष उवाच', 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'किस्त्रीम', 'ग्राहकहित', 'मुलांचे मासिक', 'कवितारती', 'बळीराजा', 'गतिमान संतुलन' अशी किमान हजारभर नियतकालिकं मराठीमध्ये प्रकाशित होतात. या सर्वांनाच कमी-अधिक फरकाने पोस्ट खात्याच्या गलथानपणाचा सामना करावा लागतो आहे. यातील अनेक नियतकालिकांचे अंक त्यांच्या वर्गणीदारांना वेळेवरच काय; पण अनेकदा सहा-सहा महिने किंवा वर्षभरही मिळत नाहीत. अंक मिळाला नाही तरी, काही वर्गणीदार संबंधित नियतकालिकाकडे तक्रार करत नाहीत. अनेकदा ते कळवतही नाहीत; पण मग पुढच्या वर्षाची वर्गणीच भरत नाहीत. अर्थात, अजूनही काही वर्गणीदार फोन करून तक्रार करतात; पण अंक न मिळण्याच्या तक्रारी इतक्या वाढल्या आहेत की, हल्ली जवळपास सगळ्याच नियतकालिकांना आपल्या अंकामध्ये 'पोस्ट खात्याकडून अंक वेळेवर न मिळाल्यास अमुक तारखेपर्यंत कळवावे. म्हणजे नवीन अंक पाठवला जाईल,' अशा प्रकारची निवेदनं छापावी लागतात. बरीच नियतकालिकं तक्रार आली की, नवीन अंक पोस्टाने पाठवतात; पण तेही मध्येच गायब होतात. त्यामुळे काही नियतकालिकांनी असे दुसरे अंक कुरियरने पाठवण्याची सोय केली आहे; पण तक्रारींची संख्या सातत्याने वाढत असल्याने ते प्रत्येक वेळीच शक्य होत नाही. मनुष्यबळ आणि आर्थिकबळ या दोन्ही पातळ्यांवर या नियतकालिकांना लढावं लागत आहे. अनेक नियतकालिकांना ते शक्य होत नाही. त्यांचं अर्थकारण मर्यादित स्वरूपाचं असल्याने त्यांना तसं करणं परवडत नाही.

या सर्वांचा परिणाम असा होतो आहे की, या नियतकालिकांची अवस्था चक्रव्यूहात सापडल्यासारखी झाली आहे. काहीजण याचा दोष या नियतकालिकांनाच देतात. त्यांना दूरदृष्टी नाही. त्यांना मार्केटिंग, वितरण, जाहिरात यांवर पैसे खर्च करायचे नसतात. नोकरीवर ठेवलेल्या कामगारांना व्यवस्थित पगार द्यायचा नसतो. दहा कोटींच्या महाराष्ट्रात एखाद्या नियतकालिकाच्या दहा-बारा हजार प्रती खपायला काय लागतं? महाराष्ट्रात किती शाळा, महाविद्यालयं, ग्रंथालयं, संस्था-संघटना आहेत. कितीतरी वाचक आहेत. त्यांना नवीन वाचायला मिळालं, तर हवंच आहे. शिवाय, नवा वाचक सातत्याने तयार होतो आहे. ग्रामीण भागात शिक्षणाच्या प्रसारामुळे तिकडे साक्षरतेचं प्रमाण वाढत आहे. तिथल्या नवशिक्षितांना वाचनाची आवड आहे; पण आपण त्यांच्यापर्यंत पोहोचतो का? आपल्या कार्यालयात बसून वाचक मिळत नाहीत, असा कंठशोष करायचा... अशाने वाचक मिळत नसतात... स्वत:ची वेबसाइट सुरू करणं, त्यावर अंक टाकणं, मेलवरून अंक पाठवणं, हा आधुनिक मार्ग हाताळायला काय हरकत आहे? आता कितीतरी लोक इंटरनेट सुविधेचा वापर करतात... असे सल्ले अनेक धुरीण देताना दिसतात. त्यांना बहुधा, या नियतकालिकांचं स्वरूप, त्यांचा उद्देश आणि अर्थकारण माहीत नसतं.

**जाहिरातींचा अभाव**

आणि भारतातील इंटरनेट सुविधा वापरणाऱ्यांची संख्या 10 टक्क्यांच्या पुढे नाही, याचीही खबरबात नसते. ते संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन वापरतात, म्हणून सगळं जगच ते वापरतं, असा त्यांचा समज असतो. असो. काही उदाहरणं पाहता येतील. 'रूपवाणी' हे प्रभात चित्र मंडळाचं मासिक गेली 20 हून अधिक वर्षं प्रकाशित होत आहे. चित्रपटविषयक लेखनाला वाहिलेल्या या मासिकाचे वर्गणीदार जेमतेम दीड-दोन हजार आहेत. 'मराठी संशोधन पत्रिका' हे मराठी संशोधन मंडळाचं नियतकालिक मराठीतल्या साहित्यविषयक संशोधनाला वाहिलेलं

त्रैमासिक आहे. त्याच्या वर्गणीदारांची संख्या हजाराच्या घरातही नाही. 'प्रति सत्यकथा' असा साहित्य जाणकारांकडून ज्याचा उल्लेख केला जातो, त्या 'अंतर्नाद'च्या वर्गणीदारांची संख्याही दोन हजाराच्या आसपास आहे. 'मसाप पत्रिका'चे वर्गणीदार दहा हजार आहेत; पण त्यांच्यापर्यंत अंक दर महिन्याला पोहोचवायचा कसा, हाच प्रश्न साहित्य परिषदेला भेडसावतो आहे. 'पंचधारा' हे आंध्र प्रदेश साहित्य परिषदेकडून प्रकाशित होणारं द्वैमासिक हैदराबादमधून निघतं. महाराष्ट्राबाहेरून निघणारं हे मासिक मराठी, हिंदी, उर्दू, कन्नड आणि तेलुगू या पाच भाषांतील साहित्याचा चांगला ऊहापोह करतं. 'आजचा सुधारक' हे वैचारिक स्वरूपाचं मासिक नागपूरहून प्रकाशित होतं; पण अतिशय गंभीर स्वरूप असल्याने त्याचे वर्गणीदारही मोजके आहेत आणि खपही. परिणामी, त्याला जाहिरातीही मिळत नाहीत. अलीकडच्या काळात नवीन लेखनही मिळेनासं झालं आहे. त्यामुळे या नियतकालिकाला हल्ली इतर मासिकं, वर्तमानपत्रं यांमध्ये आलेलं लेखन पुनर्प्रकाशित करावं लागतं. 'पालकनीती', 'मिळून साऱ्याजणी', 'परिवर्तनाचा वाटसरू', 'भाषा आणि जीवन', 'नव अनुष्टुभ', 'आपलं पर्यावरण', 'वनराई', 'सत्याग्रही विचारधारा', 'समाज प्रबोधन पत्रिका', 'नवभारत', 'प्रतिष्ठान', 'आपले जग', 'शेतकरी संघटक', 'अर्थबोधपत्रिका', 'साप्ताहिक साधना', 'विकल्पवेध', 'व्यापारी मित्र', 'पुरुष उवाच', 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'किस्त्रीम', 'ग्राहकहित', 'मुलांचे मासिक', 'कवितारती', 'बळीराजा', 'गतिमान संतुलन' या नियतकालिकांना अशाच प्रकारे वेगवेगळ्या समस्यांचा सामना करावा लागतो आहे.

ही सर्वच नियतकालिकं विशिष्ट ध्येयाने सुरू झालेली आहेत. 'समाज प्रबोधन पत्रिका'ला एकेकाळी मराठीतलं 'इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकली' समजलं जात असे. 'बळीराजा' हे महाराष्ट्रातलं प्रचंड खपाचं एक अग्रगण्य कृषी नियतकालिक आहे. 1970 सालापासून ते नियमितपणे पुण्यातून प्रकाशित होत आहे. 'अंतर्नाद' हे मासिक लवकरच 20 वर्षं पूर्ण करेल. 'साधना' साप्ताहिक पंचाहत्तरीच्या दिशेने दमदार वाटचाल करत आहे. किर्लोस्करवाडीहून प्रकाशित होणारे वसंत आपटे यांचं 'आपले जग' किंवा कोकणातील कुडावळे येथून प्रकाशित होणारं दिलीप कुलकर्णी यांचं 'गतिमान संतुलन' अशी नियतकालिकं विज्ञानविषयक दृष्टिकोन रुजवण्याच्या प्रेरणेने चालवली जात असलेली नियतकालिकं आहेत.

**एकखांबी तंबू**

वर उल्लेख केलेल्यांपैकी बहुतांशी नियतकालिकं ही एकखांबी तंबूसारखी आहेत. त्यांचा जीवही छोटा आहे आणि पसाराही. प्रसंगी पदराला खार लावून ती चालवली जात आहेत; पण विशिष्ट उद्देशाने ती चालवली जात असल्याने त्यांना 'ध्येयवादी नियतकालिकं' म्हणायला हरकत नाही. अशा नियतकालिकांची खरी बांधिलकी ही त्यांच्या वर्गणीदारांशीच असते. हा वर्गणीदार त्यांचा ध्येयवाद मान्य असणारा असतो. त्यानुसार, आपलं जगणं जगायचा प्रयत्न करणारा असतो. साहजिकच, अशा विशिष्ट विचाराशी बांधिलकी मानणारे लोकच ही नियतकालिकं वाचतात. ती स्टॉलवर, एसटी स्टँडवर, इतकंच काय; पण पुस्तकांच्या दुकानात विक्रीला ठेवली तर ती विकली जाणार नाहीत, जात नाहीत. मुंबईत 'पीपल बुक हाऊस' या फोर्टमधल्या पुस्तकाच्या दुकानात हिंदी-मराठी-इंग्रजीतील बरीचशी नियतकालिकं विक्रीला ठेवलेली असतात; पण त्यातल्या कुणाचीही विक्री समाधानकारक होत नाही. कारण या नियतकालिकांचा वाचकवर्गच वेगळा असतो. तो मनोरंजनासाठी वाचणारा नसतो, तर गंभीर वाचनासाठी आसुसलेला असतो. आपल्या आवडीच्या विषयाबाबतचं वाचन तो प्राध्यान्याने करतो. म्हणून त्याला या नियतकालिकांचा आधार वाटतो.

यातली अनेक नियतकालिकं ही काही सामाजिक संस्था-संघटनांशी निगडित आहेत. कुठलीही संघटना बहराच्या

काळात असते, तेव्हा तिच्याबद्दल लोकांना उत्सुकता असते, आत्मीयता असते आणि कुतूहलही असतं. चळवळ थंडावत चालली की, तिच्या मुखपत्रांनाही ओहोटी लागते, हा आपल्याकडचा आजवरचा इतिहास आहे. त्याचाही परिणाम त्यांच्या वर्गणीदारांच्या संख्येवर होतो आहे, नाही असं नाही. 'युक्रांद'चे संस्थापक कुमार सप्तर्षी 80 च्या दशकात महाराष्ट्रातल्या तमाम तरुणांचे हिरो होते. त्यामुळे त्यांचं 'सत्याग्रही विचारधारा' जोरावर होतं. आता मात्र ते 'युक्रांद'शी संबंधित लोकांपुरतंच मर्यादित झालं. ही गोष्ट ओळखून सप्तर्षींनी 'सत्याग्रही विचारधारा'ला थोडं व्यापक करण्याचा प्रयत्न केला आहे, म्हणून ते अजूनही चालु आहे; पण त्याचा खप काही दोन-अडीच हजारांच्या पुढे जाऊ शकलेला नाही. शरद जोशी यांच्या चळवळीचंही तसंच झालं आहे. 'शेतकरी संघटक' या शरद जोशी यांच्या पाक्षिकाचा खप पाच हजार आहे.

**पूर्वग्रहदूषित दृष्टी**

पण संस्था-संघटना-चळवळी यांच्याशी संबंधित असल्याने या नियतकालिकांकडे काहीशा पूर्वग्रहाने पाहिलं जातं. त्यांनी सर्वसमावेशक होण्याचा प्रयत्न केला, तर तोही यशस्वी होत नाही. त्यातही सामाजिक आशयाची नियतकालिकं म्हटलं की, बलस्थानांआधी त्यांच्या मर्यादांबद्दलच बोललं जातं. आक्रस्ताळेपणा, ऊरबडवेपणा, पूर्वग्रहदूषित दृष्टी आणि एकसुरीपणा या चार शब्दांनी त्यांचं भवितव्य अधोरेखित केलं जातं. कारण ही नियतकालिकं रूढार्थानं वाचकांचं मनोरंजन करण्याचं, त्यांचा अनुनय करण्याचं टाळतात; पण ही नियतकालिकं राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घटना-घडामोडींचं विश्लेषण करून वाचकांच्या विचारांना दिशा देण्याचं काम करतात. एकेकाळी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून नियतकालिकांतल्या चांगल्या लेखांची, वादांची झलक वाचायला मिळत असे. तीही आता दिसत नाही. मात्र हल्ली वर्तमानपत्रं या नियतकालिकांची दखलच घेईनाशी झाली आहेत. या साऱ्या समस्यांमध्ये आता पोस्टाची भर पडली आहे. ती डोकेदुखी म्हणावी इतकी त्रस्त समस्या बनू पाहत आहे. टीव्हीचं आक्रमण, इंग्रजी माध्यमामुळे मराठीपासून दुरावत चाललेली तरुणपिढी, वाचनाच्या सवयीचा अभाव, चांगल्या साहित्याचा संकोचत चाललेला अवकाश, तुटपुंजी वितरण यंत्रणा, जाहिरातींचं दुर्भिक्ष, मराठी माणसांची अल्पसंतुष्ट वृत्ती अशा अनेक अडचणी सांगितल्या जातात. त्याबद्दल तावातावाने चर्चाही केली जाते. त्यात काही प्रमाणात नक्कीच तथ्य आहे. थोडक्यात काय तर, मराठीतल्या अनेक नियतकालिकांची अवस्था चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी झाली आहे. त्यातून बाहेर कसं पडायचं, हा यक्षप्रश्न आहे.

(दै. मी मराठी Liveच्या 'सप्तमी'(5 जुलै 2015) च्या अंकातून साभार.)

jagtap.ram@gmail.com

●●●

# अजब न्याय....

*सुभाष थोरात*

बाजारीकरण.....खाउजा.....मानसिकता.....

न्यायालयाने सलमान खानला हिट अँड रन प्रकरणात दोषी ठरवून पाच वर्षाच्या सक्त मजुरीची शिक्षा सुनविली आहे.(या शिक्षेला उच्च न्यायालयात त्वरित स्थगितीही मिळाली, त्यामुळे सलमानची तुरूंगवारी सध्यातरी टळली आहे). पण सलमानला शिक्षा सुनावताच हिंदी सिनेसृष्टीतील अनेक मंडळींचे कंठ दु:खाने दाटून आले होते. परंतु सलमानच्या गाडीखाली जो माणूस झोपेतच चिरडून मारला गेला आणि आणखी काही लोक जखमी होऊन कायमचे अपंग झाले, त्यांच्याबद्दल या वर्गाने कधी कळवळा व्यक्त केल्याचे आठवत नाही.

उलट अभिजित भट्टाचार्य नामक गायकाने प्रतिक्रिया देताना गरिबांविरोधात जी मुक्ताफळे उधळली आहेत ती या अभिजन वर्गाची प्रातिनिधिक प्रतिक्रिया मानली पाहिजे. तो म्हणाला, फुटपाथ गरिबांच्या बापाची आहे काय? जे फुटपाथवर कुत्र्यासारखे झोपतात ते कुत्र्यासारखेच मरणार. वर म्हटल्याप्रमाणे स्वत:ला सुसंस्कृत अभिजन म्हणवणाऱ्या वर्ग- जातीतील लोकांची ही प्रतिक्रिया आहे. इतर उघडपणे असे म्हणणार नाहीत इतकेच. पण अभिजित भट्टाचार्याने आपल्या वर्ग-जातीच्या भावना आणि विचार वरील प्रतिक्रियेत व्यक्त केलेल्या आहेत. त्यातून आपला हा आधुनिक म्हणवला जाणारा अभिजन वर्ग कसा रानटीपणाकडे झुकला आहे हेच दिसून येते.

एकेकाळी गुरू दत्तच्या `प्यासा'मध्ये ही जी अभिजन वर्गाची दुनिया आहे त्याबद्दल साहीरने याच चित्रपटसृष्टीत *जला दो इसे फूक डालो ये दुनिया, मेरे सामनेसे हटा दो ये दुनिया, ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है* किंवा *लोग कहते है ठीकही कहते होंगे, मेरे मोहल्लेमें इन्सान न रहते होंगे* अशा शब्दात गरिबांची ठाम बाजू घेतली होती. अर्थात अशी हजारो उदाहरणे देता येतील पण आज याच चित्रपटसृष्टीतील एक गायक वरीलप्रमाणे प्रतिक्रिया व्यक्त करून गरिबांचा जगण्याचा अधिकारच नाकारत आहे आणि त्याबद्दल त्याची कानउघाडणी कोणी करीत नाही. याचा अर्थ आपण काय घ्यायचा?

मार्क्सने बाजारवादासंबंधी लिहिताना असे म्हटले आहे की, बाजार समाजासाठी आवश्यकच असतो, पण काही मानवी मूल्ये ही बाजाराच्या वर असतात. परंतु बाजारच जेव्हा समाजाची मूल्ये ठरवू लागतो तेव्हा पुन्हा एकदा रानटी युगाची सुरूवात होते. आज जगात आणि आपल्या देशात घडणाऱ्या घटनांकडे बारकाईने पाहिल्यास मार्क्सच्या वरील वाक्याची सत्यता प्रकर्षाने जाणवते. आज बाजारवादाने जगभर थैमान घातले आहे.

या बाजारवादाने माणसाचे माणूसपण मारून टाकले आहे. सर्व गोष्टी शेअर बाजाराच्या हिशोबात पाहणाऱ्या या उच्चभ्रू समाजाकडून गरिबांसाठी साधा नि:श्वासही दुर्लभ झाला आहे. तो अप्पलपोटी, स्वकेंद्री, आपल्याच पोळीवर तूप ओढण्यात शौर्य असल्याचा गर्व बाळगणारा बनला आहे. तसे नसते तर एक दीडदमडीचा गायक असे उद्गार काढण्याची हिंमत करू शकला नसता.

फुटपाथवर झोपणारे गरीब बेघर लोक एक तर मुस्लीम किंवा दलित म्हणवले जाणारे हिंदुच असतात, धर्मांतरित बौध्द असतात, भटके विमुक्त, आदिवासी समाजातील असतात. जात-वर्ग-धर्म या सर्वच पातळीवर त्यांच्याबद्दल

भेदभावाचीच भावना उच्च समजल्या जाणाऱ्या जात-वर्गातील लोकांची असते. ती खासगी चर्चेतून ते निष्ठूरपणे व्यक्त करीत असतात. सलमान प्रकरणात मेलेला माणूस आणि जखमी होऊन कायमचे अपंग झालेले मुस्लीम धर्माचेच आहेत. ते जर हिंदू असते तर `गर्वसे कहो' म्हणणाऱ्यांनी यातून वेगळेच राजकारण पुढे आणले असते. आज देशात जे धार्मिक विद्वेषाचे वातावरण सरकारी पक्षाचे म्हणवले जाणारे लोक निर्माण करीत आहेत, त्यामुळे एकेकाळी खलिस्तानवाद्यांशी निधडया छातीने लढणाऱ्या जुलिओ रिबेरोसारख्या प्रामाणिक पोलीस अधिकाऱ्याला भीती वाटू लागली आहे. एका मुलाखतीत त्यांनी हे स्पष्टपणे नमूद केले आहे, केवळ ख्रिश्चन म्हणून ते मला गोळ्यां घालतील. ही परिस्थिती मार्क्सने वर म्हटल्याप्रमाणे रानटी युगाचीच नांदी आहे.

बाजारवादाच्या पूर्ण आहारी गेलेल्या आपल्या अध:पतित भांडवली समाजात ज्याला बाजारात पत आहे, त्यालाच समाजात पत आहे. बाकी लोक त्यांच्या दृष्टीने भुईला भार आहेत. त्यांना जगण्याचा अधिकारच नाही. हिटलरच्या नाझी तत्वज्ञानाचा मुख्य गाभा हाच होता. जे त्यांच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ आहेत त्यांनाच जगण्याचा अधिकार आहे, इतरांना नाही आणि म्हणूनच ज्यूंची कत्तल केली गेली. आपल्याकडील जातिव्यवस्थेचे सार तेच आहे. म्हणूनच संघ परिवाराला हिटलर आदर्श वाटतो. त्यामुळेच त्यांनी नाझी पक्षाच्या धर्तीवर आपले संघटन उभे केले आहे. नाझींचे तत्वज्ञान जसे ज्यू द्वेषावर आधारित आहे तसेच यांचे मुस्लीम-दलित यांच्या द्वेषावर उभे आहे. स्त्री, शूद्र, नरनारी ताडण के अधिकारी ही दृष्टी नाझीवादाचाच भारतीय आविष्कार आहे. ही गोष्ट आज या बाजारव्यवस्थेचे जे लाभार्थी आहेत ते अभिजीत भट्टाचार्यच्या मुखातून प्रातिनिधिकपणे बोलत आहेत. गरीब जनतेला मुंबई शहरात किंबहुना एकंदरच शहरात घरे नाहीत, नोकऱ्या नाहीत. ती या भांडवली व्यवस्थेची दिवाळखोरी आहे. कारण ती फक्त मूठभर पैसेवाल्या लोकांचेच चोचले पुरविणारी धोरणे आखते. गरिबांच्या जीवनाची किंमत त्यांच्या दृष्टीने शून्य आहे. गरिबांना नष्ट करणे हाच गरिबी नष्ट करण्याचा त्यांच्या दृष्टीने उपाय आहे. पण हा गरीब, कष्टकरी माणूस नष्ट झाला तर हे लोक कोणाचे रक्त पिणार आहेत? जगात श्रमाशिवाय काहीही निर्माण होत नाही, त्यामुळे जे निर्माण होते त्यावर श्रमिकांचाच अधिकार असला पाहिजे, हे मार्क्सने उगीचच लिहून ठेवलेले नाही. भांडवली समाजात बरोबर याच्या उलटी परिस्थिती आहे. त्यामुळे त्यांची आधुनिक समजली जाणारी चंगळवादी, बांडगुळी संस्कृती या गरिबांच्या श्रमावरच उभी आहे.

हे फुटपाथवर राहणारे लोकच तुमचे रस्ते साफ करतात, तेच काच पत्रा गोळा करून शहराच्या स्वच्छतेला हातभार लावतात. छोटी-मोठी कामे करून तुम्हाला सुविधा पुरवितात. तुमच्या पाळलेल्या कुत्र्यांची निगा राखतात, त्यांना फिरायला घेऊन जातात. तुमचे बूटपॉलीश करतात, तुमच्या महागडया गाडया धुतात. म्हणूनच तुम्हाला ते किडामुंगी वाटतात. त्यांचे मरण तुम्हाला कुत्र्यांचे मरण वाटते. पण ही माणसे स्वत:च्या श्रमावर जगणारी माणसे आहेत. भांडवलशाहीने मूठभर भांडवलदारांच्या आणि त्यांची दलाली करणाऱ्या वर्गाच्या हितासाठी राबवलेल्या धोरणातून ही माणसं विस्थापित झाली आहेत. सर्वस्व गमावून बसलेली आहेत. कधी काळी वर म्हंटल्याप्रमाणे समाजातील संवेदनशील मध्यमवर्गाला त्यांच्याबद्दल कणव होती. आज हा वर्गही संवेदनाहीन बनत चालला आहे. उच्चवर्गीय मानसिकतेने त्याला कोडगा बनवला आहे. गरिबी हा त्यांनाही गरिबांचाच गुन्हा वाटतो, त्यासाठी व्यवस्था जबाबदार नाही तर गरीबच जबाबदार आहेत असे त्यांना वाटते. आज अशी उलटी गंगा वाहू लागली आहे. आज सलमान खानला शिक्षा झाल्याबद्दल काही लोक न्यायव्यवस्थेची देर है अंधेर नही अशी वाहवा करीत आहेत. पण तेरा वर्षे न्याय मिळायला लागणे हे न्यायव्यवस्थेनेच म्हटल्याप्रमाणे, न्यायाला उशीर म्हणजे न्याय नाकारणे होय. एका अर्थाने हे

न्यायव्यवस्थेचे अपयशच आहे. सलमानच्या गाडीखाली फुटपाथवर झोपणारे गरीब मेले पण प्रतिष्ठित मेले असते तर इतका उशीर झाला असता काय? आणि आज सलमानबद्दल गळा दाटून बोलणारे त्या मेलेल्या आणि अपंग झालेल्या गरिबांबद्दल दोन शब्द तरी बोलायला तयार आहेत काय? उलट निर्लज्जपणे सलमानकडून भरपाई घ्यावी आणि त्याला समाजकार्य करण्यास सांगावे अशी गुन्ह्यांची भलावण करीत आहेत.

माणसाचे मूल्य तुम्ही ठरवू शकता काय? अर्थात जेथे पैशावरच माणसाची किंमत ठरते तेथे असाच दृष्टीकोन समोर येणार. शेवटी फुटपाथवर राहणाऱ्या माणसांची त्यांच्या दृष्टीने किंमत ती काय? पाच पन्नास हजार किंवा जास्तीत जास्त चार-पाच लाख. पैसे द्या आणि मोकळे व्हा! किती सोपा न्याय! यांच्या कुत्र्यांची किंमतही माणसापेक्षा जास्त असते! या मुंबईच्या फुटपाथनेच नारायण सुर्वे यांच्यासारखा महाकवी घडवला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंना या फुटपाथनेच आश्रय दिला. त्यामुळे या फुटपाथवर राहणाऱ्या माणसांना तुच्छ लेखू नका. या दोन महाकवींनी आपल्या काव्यातून भांडवली व्यवस्थेच्या मरणाची अटळता लिहून ठेवली आहे. ती कामगारवर्गाच्या मुक्तियुद्धासाठी सतत प्रेरणा देत राहील आणि आपण आज ना उद्या अटळपणे हे मुक्तियुद्ध जिंकू. जेव्हा कोणालाच फुटपाथवर राहण्याची आणि मरण्याची वेळ येणार नाही.

तूर्तास मार्क्सने म्हटल्याप्रमाणे पुन्हा रानटी युग अवतरले आहे आणि या युगाला मूठमाती देऊन माणसाला पुन्हा माणूस बनवण्याचे काम ही फुटपाथवरची जनताच करेल यात काहीच शंका नाही.

जीवनमार्गच्या सौजन्याने

*kiranm.subhasht@gmail.com*

•••

# ‘मराठी’ ची चर्चा आणखी एकदा; पुन्हा पुन्हा

*सुरेश सावंत*

समाज.....भाषा.....मानसिकता......

एक वांद्रे कॉलनी,’ म्हणून कंडक्टरना तिकीट मागितले की ते आणि अन्य सहप्रवाशीही चमत्कारिकपणे आपल्याकडे पाहताहेत असे वाटते. ‘हे घ्या बांद्रा कॉलनी’ म्हणत कंडक्टर मला दुरुस्त करतात. कोणीतरी ‘बँड्रा’ उच्चारुनही तिकीट मागतात. ते मात्र तितकेसे त्यांना चमत्कारिक वाटताना दिसत नाही. गंमत म्हणजे बसचा फलक ‘वांद्रे वसाहत’ असताना हे चालत असते. मी फक्त ‘वांद्रे’ म्हणत असतो. ‘वसाहत’ म्हणत नाही. ‘कॉलनी’ असेच म्हणतो. कंडक्टरना ‘कंडक्टर’ किंवा ‘मास्तर’ म्हणतो. ‘वाहक’ म्हणत नाही. ड्रायव्हरना तर ‘चालक’ म्हणण्याची मला हिंमतच होत नाही.

तरीही माझा हा किमान मराठीचा आग्रह जवळच्यांना जास्तीचा वाटतो. बांद्रा किंवा बँड्रा म्हटल्याने काय फरक पडतो, असे त्यांना वाटते. मराठीत ज्या शब्दाचा जो उच्चार असेल, तोच उच्चारला जायला हवा, हा साधा आग्रह माझा असतो.

पण या साध्या उच्चारांच्या नेटकेपणावर मराठीचे भवितव्य अवलंबून आहे का?

खरे म्हणजे नाही. भाषा ही विकसित होत असते. जसे नद्यांचे संगम होतात, तसेच भोवताली बोलल्या जाणाऱ्या भाषांचा एकमेकांवर परिणाम होत असतो. नवे शब्द, नवे उच्चार परस्परांत मिसळत असतात. आजची मराठी ही चक्रधरांची किंवा ज्ञानेश्वरांची नाही. शिवाजी महाराजांचीही नाही. महाराजांच्या काळातील मराठीत सुलतानी राजवटीच्या अमलामुळे कितीतरी फारसी शब्द मिसळले गेले. हवा, जमीन, वकील, गरीब, सराफ, महाल, तपशील हे मूळ फारसी शब्द असल्याचे कोणाला सांगूनही पटणार नाही, इतके ते आज मराठीत रुळले आहेत. उच्चारांच्या सुलभीकरणाच्या प्रवृत्तीनेही शब्द बदलतात. चंद्रकांतला 'चंदर' म्हणून तर सुरेशला 'सुरेस' म्हणून हाक मारणे हे आमच्या गावी आजही चालते. मी शाळेत सुरुवातीला 'सुरेस' असेच नाव सांगत असे. आमच्या बाईंनी ते दुरुस्त केल्यावर मग 'मीलन'मधल्या सुनीलदत्तच्या 'अरे बाबा, शोर नहीं सोर' चालीवर मी 'सुरेस नाही, सुरेश..', '..स नाही श..श..' असे मला हाक मारणाऱ्यांना दुरुस्त करु लागलो.

शब्द ही ध्वनिचिन्हे आहेत. हे शब्द उच्चारल्यावर त्याचा काही एक अर्थ ऐकणाऱ्याला लागतो. तोच महत्वाचा असतो. स किंवा श याला स्वतःचे मूल्य काही नसते. पाली भाषेतील 'सरणं' व संस्कृतमधील 'शरणं' यांचा अर्थ एकच. काही वेळा एकाच शब्दाचे दोन भाषांतील अर्थ वेगळे असू शकतात. लिंग वेगळे असू शकते. मराठीत 'व्यक्ती' स्त्रीलिंगी तर हिंदीत पुल्लिंगी. अलिकडे मराठीतही अनेकजण 'मला एक व्यक्ती भेटला' असे बोलु लागले आहेत. माझ्यासमोर असे बोलणाऱ्यांना मी दुरुस्त करायचा आधी प्रयत्न करत असे. आता तो सोडून दिला आहे. या लिंगबदलाने अर्थात काही फरक पडत नसतो. उत्तरप्रदेशातील हिंदीत 'दुकान' स्त्रीलिंगी, तर छत्तीसगडी हिंदीत 'पुल्लिंगी' उच्चारले जाते.

मुद्दा असा, हे बदल, हे स्वीकार हे मूळ भाषेत सहजासहजी त्याचे प्रत्यय लावून स्वीकारले जातात, तेव्हा प्रश्न नसतो. 'ड्रायव्हरने गाडी साईडला घेतली' यात ने, ला प्रत्ययांमुळे ड्रायव्हर, साईड हे शब्द मराठीत सामावले जातात. जगातल्या सगळ्याच भाषा अशा बदलत असतात. जिचा व्यवहारात अधिक वापर होतो, जितक्या विविध क्षेत्रातले लोक तिचा वापर करतात, तितकी ती अधिक समृद्ध होत जाते. इंग्रजी त्यामुळेच समृद्ध होत गेली आहे.

मग माझा बांद्रा-बँड्राला विरोध का? मी अचूकवादी नाही. माझा शब्दांना विरोध नाही. अन्य भाषकांनी तसे ते उच्चारण्यासही माझी हरकत नाही. वास्तविक मराठी माणसांनीही उच्चारण्यास हरकत असणार नाही. पण आज हे उच्चार करणारी मराठी माणसे वांद्रे, बांद्रा, बँड्रा असा तिन्हींचा सहज एकाच प्रतिष्ठेने उच्चार करत नाहीत, तर 'वांद्रे' म्हणणे त्यांना कमीपणाचे वाटते व इतर दोन त्यांना प्रतिष्ठितपणाचे वाटते. माझा आक्षेप याला आहे. बहुजनसमाजातील खास मराठी घरातील बीडीडी चाळीतील मुले कॉलेजमध्ये गेल्यावर कोठे राहता असे विचारल्यावर 'मी बीडीडी 'चॉल' मध्ये राहतो' असे सांगू लागतात. कारण त्यांचे इंग्रजी माध्यमातून आलेले अमराठी सहाध्यायी तसा उच्चार करत असतात. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेत आपल्यापेक्षा पुढारलेला समूह जी भाषा बोलतो, ती प्रतिष्ठित मानली जाते. त्यांनी आपल्या भाषेची मोडतोड केली तरी ते आपल्याला खुपत नाही. उलट ती तोडफोडच आपण शिरावर घेऊन चालु लागतो.

एका जोशी नावाच्या मुलीने शिंदे नावाच्या मुलीची फेसबुकवरील एक शब्द लिहितानाची चूक जाहीरपणे व कटाक्षाने काढली. तिने नोंदवले- अगं 'विशिष्ठ' नाही 'विशिष्ट'. तिने 'ट' वर जोर देताना 'ही बहुजन समाजातली 'आनिपानी'वाली माणसं, यांना धड मराठी शुद्ध बोलता येत नाही.' असे काहीतरी तिचे स्वगत चालु असावे, असे माझ्या मनात आले. अशा अनेक मराठी जोशी 'अशोक'चा 'अशोका', 'सिद्धार्थ'चा 'सिद्धार्था' असा उच्चार करताना

सेमिनारमध्ये मला आढळतात. त्यांना ते चुकीचे किंवा 'अशुद्ध'वाटत नाही. कारण सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेत त्यांच्यापेक्षा वरचढ असणारे इंग्रजी भाषक इंग्रजी स्पेलिंगप्रमाणे तसाच उच्चार करत असतात. 'गांधी मला भेटला'तील वसंत गुर्जरांच्या भाषेला अश्लील म्हणताना यांच्या आपसातील इंग्रजी संवादात मात्र दर चार वाक्यांनंतर 'Fuck' शब्द येत असतो.

माझ्या मनावर लहानपणी 'सुरेस' ला प्रतिष्ठा नाही, एवढेच नव्हे, तर ते मागासलेपणाचे, अडाणीपणाचे आहे असेच बिंबले गेले. कारण असा उच्चार करणारे आमचे लोक हे जातीने खालचे, संपत्ती-सत्तेपासून वंचित होते. ते अप्रतिष्ठित होते. माझ्या बाई (ज्या खूप चांगल्या, प्रेमळ व आमच्याविषयी आत्मीयता असणाऱ्या असल्या तरी) या निकषांवर वरच्या होत्या. त्यांचे अनुकरण हेच प्रतिष्ठा मिळवायचे, प्रगती करण्याचे गमक मी मानू लागलो. शक्यतो आई-वडिलांनी शाळेत येऊ नये, बाईशी 'अशुद्ध' बोलुन आपली इज्जत घालवू नये, असेच वाटायचे. आम्ही कोकणी 'ळ'चा उच्चार 'ल' असा करत असू. माझा एक मामेभाऊ शुद्ध बोलण्याच्या प्रयत्नात सगळे 'ल' 'ळ' असेच उच्चारायचा. वकिलालाही 'वकिळ' असेच म्हणायचा. मी मात्र ब्राम्हणी (चित्पावनी) मराठी (जी आज प्रमाण मराठी भाषा मानली जाते) आत्मसात केली. अगदी 'श' व 'ष' यातील उच्चारभेदांसहित. सगळ्या पारंपरिक शिव्या टाकून दिल्या. अगदी मनातही उच्चारत नाही. या शुद्ध-अशुद्धच्या फेऱ्यातून मी आज बाहेर असलो, तरी माझी भाषा प्रमाण मराठीच राहिली. माझी व्यक्त होण्याची, सांस्कृतिक व्यवहाराची भाषा आज तीच आहे. केवळ विद्रोहासाठी म्हणून माझी मूळ भाषा वापरणे, हे आता कृत्रिम असणार आहे.

भाषा 'शुद्ध' नसते. ती 'प्रमाण' असू शकते. अनेक बोली बोलणाऱ्या समूहांचा प्रादेशिक व्यवहार होण्यासाठीची ती गरज असते. बोलीतून प्रमाणभाषेकडे सरकणे हे शाळेत व्हायला हवे असते. पण या शुद्धतेने गडबड केली. सरसकट प्रमाण भाषा (तीही संस्कृतप्रचुर) स्वार झाली. अशुद्धता ही व्यक्त होणाऱ्याच्या मनात, वृत्तीत असते. 'रांडच्या' संबोधनात मायेचा ओलावा असू शकतो, तर बिगरशिवीचे संबोधन ठार कोरडे असू शकते.

एकेकाळच्या प्रमाण मराठीच्या प्रतिष्ठेची जागा आता इंग्रजी घेत आहे. समाजातला प्रमाण मराठीचा आग्रह धरणारा वर्ग आता इंग्रजीकडे सरकला आहे. तिच्या आधारे त्याने नव्या काळातील सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा मिळवली आहे. त्याचेच अनुकरण बहुजन व तथाकथित तळचे समुदाय करु लागले आहेत. त्यातूनच वांद्रेऐवजी बांद्रा-बँड्राला प्रतिष्ठा मिळत आहे.

सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा किंवा सांप्रत अन्य मानकांनी निर्देशित प्रगती आम्ही करत असू तर आपली भाषा टिकली पाहिजे, हा आग्रह का?

यावर खूप तज्ज्ञांनी लिहिले आहे. त्या सगळ्यात मी जात नाही. एकच सांगतो, भाषा ही फक्त संवादाचे माध्यम नसते. ते ती भाषा बोलणाऱ्या समूहाचे सांस्कृतिक संचित असते. त्यात त्या समूहाच्या माणूसपणाच्या विकासाचा इतिहास असतो. त्याचे भावविश्व, त्याची मूल्ये, मानसिक आंदोलने त्यात असतात. त्याच्या जीवनाचे सौंदर्य त्यात असते. लोकगीते, नाटक, कथा इ. साहित्याद्वारा ते सौंदर्य आविष्कृत होत असते. हो, त्या समूहाचे पारंपरिक ज्ञानही त्यात असते. म्हणी, वाक्प्रचारांनी त्या भाषेचे सौंदर्य तर वाढतेच; पण आशयही अधिक प्रभावीपणे व नेमकेपणाने व्यक्त होतो. चळवळीत लगेच यश मिळत नाही, सतत लढावे लागते, हे सांगताना मी 'पी हळद अन् हो गोरी' असे होत नसते, अशी म्हण वापरतो. हे ऐकल्यावर लोक हसतात. त्यांना तो मुद्दा बरोबर पोहोचतो. ज्या संस्कृतीत हळदीचा आणि गोरेपणाचा हा संबंध जोडलेला नसतो, त्या संस्कृतीतील भाषेतून हा आशय कसा व्यक्त करणार? ती भाषा

बोलणाऱ्या समूहांत दुसरी कोणतीतरी म्हण असू शकते. समजा ती म्हण मला ठाऊक असली व ती मी उच्चारली, तरी समोरचे त्या संस्कृतीशी परिचित नसतील, तर त्यांना तिचा बोध कसा होणार? तिची गंमत कशी कळणार?

परिसरात बोलली जाणारी बोलीभाषा, मग प्रमाण भाषा व नंतर अधिक व्यापक समुदायांशी संवादासाठी इंग्रजी भाषा असाच शैक्षणिक माध्यमाचा क्रम असायला हवा. हा प्रमाण भाषेच्या किंवा इंग्रजीच्या दुस्वासाचा प्रश्न नसतो. त्यासाठी ती भाषा 'हटाओ'ची मोहीमही घ्यायची नसते. केवळ भौतिक प्रगतीने माणूसपण विकसित होत नाही. तुमच्या माणूसपणाचे झरे तुमच्या मूळ संस्कृतीतूनच वाहत येऊन पुढे विस्तारावे लागतात. मराठी माणसाला हे समजावून सांगावे लागेल. त्याच्या न्यूनगंडाला आवाहन करुन पुन्हा भौतिक बाबींवरच सत्ता प्रस्थापित करायचे आवाहन त्याला केले जाते. यात संधिसाधू राजकारणाचा मोठा भाग असतो, हे तर उघडच असते. हटाव लुंगी-बजाव पुंगी पासून भय्यांना मारहाणीपर्यंतच्या उपक्रमांतून या न्यूनगंडाचे विरेचन झाल्याचा केवळ खोटा दिलासा मिळाला. पण काही काळाने ही नशा उतरल्यावर मराठी माणूस पुन्हा न्यूनगंडाच्या खाईत फेकला गेला. हाच क्रम सध्या चालु आहे. या मराठी माणसाला माणूसपण विकसित करण्यासाठी, जीवनाचे सौंदर्य टिकविण्यासाठी मराठीची जोपासना आवश्यक आहे, हे पटल्याशिवाय हा क्रम थांबणार नाही. हे पटविण्याची सरकारची इच्छाशक्ती नाही, हे वारंवार म्हणून झाले. सरकारवर दबाव आणण्यासाठी ते एका बाजूला म्हणतही राहू. पण हे म्हणत असताना समाजातल्या जाणत्यांनी त्यांना शक्य ते प्रयत्न करत राहायला हवेत. 'अगं अगं म्हशी' म्हणत लघुदृष्टीच्या या स्वार्थशर्यतीत आपणही धारेला लागणे थांबवावे लागेल. असे थांबून विचार करु लागलो, तर यातून बाहेर निघण्याचे मार्गही दिसू शकतील. अनेक तज्ज्ञ ते सुचवितही आहेत. पण धोक्याचे गांभीर्य समजणे व त्यावर मात करण्याची इच्छाशक्ती असणे हे सर्वप्रथम आहे.

साभारः आंदोलन शाश्वत विकासासाठी, जून 2015

*sawant.suresh@gmail.com*

•••

# नेटिझन्स इतक्या उर्मटपणाने का वागतात?

*प्रभाकर नानावटी*

तंत्रज्ञान.....मानसिकता.....युवा.....

संगणक (यात संगणकाशी संबंधित मोबाइल फोन, इंटरनेट, लॅपटॉप, वाय फाय, नेटबँकिंग, मोबाइल बँकिंग व इतर सर्व माहिती तंत्रज्ञान सुविधांचा समावेश आहे.) माणसांना चांगली माणसं बनण्यासाठी मदत करतात, हे संगणक क्षेत्रातील एका तज्ञाचे विधान आहे. परंतु निदान ब्लॉगोस्फेरमधील अनुभवावरून तरी नेटवरील माणसं उदात्त, शहाणे, संवेदनशील झाले आहेत, याबद्दल शंका घ्यावीशी वाटते. आपण कल्पनाही करू शकणार नाही एवढ्या मोठ्या प्रमाणात संगणक आपल्या आयुष्याला व्यापलेले आहे. संगणक निरक्षरता हद्दपार होत आहे. नेट आता प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनत आहे. तरीसुद्धा नेटवर वावरणाऱ्यांसाठी काही नीती - नियम, आचारसंहिता वा स्वनियंत्रण असे काहीही नसल्यासारखे नेटिझन्सचे वर्तन असते.

नेटवरील माहिती संकलन व होत असलेले विनिमय यांचे विश्लेषण केल्यास 16.8 कोटी डीव्हीडी भरतील एवढ्या माहितीचे देवाण घेवाण एका दिवसात होत आहे. प्रती दिवशी 29400 कोटी ई-मेल्स पाठवल्या जात असतात. रोज 20 लाख ब्लॉगपोस्टवर मजकूर चिटकवला जात असतो. या ब्लॉगपोस्टवरील मजकुरांची मुद्रित प्रत काढल्यास 60-64 पानाच्या साप्ताहिकाला पुढील 770 वर्षे पुरेल एवढा मजकूर उपलब्ध होऊ शकेल. 17.2 कोटी नेटिझन्स फेसबुकला भेट देतात. यासाठी 470 कोटी मिनिटं खर्ची घातल्या जातात. रोज 25 कोटी फोटो अपलोड होतात. या अपलोड झालेल्या फोटोंचे प्रिंट्स काढून एकावर एक ठेवल्यास 80 एफेल टॉवर्स इतकी उंची होईल. नेटवरून रोज 2.2 कोटी तास जुने चित्रपट व सिरियल्स बघण्यासाठी खर्ची घातला जातो. रोज 864000 तासाचे व्हिडिओ यूट्यूबवर अपलोड केल्या जातात. एकट्यानेच रोज, 24 तास, हे सर्व बघायचे ठरविल्यास 98 वर्षांचा काळ सहजपणे निघून जाईल. रोज 1.87 कोटी तास संगीत ऐकले जाते. प्रती दिवशी 1288 अप्लिकेशन्स अपलोड होतात व 3.5 कोटी अप्लिकेशन्स डाउनलोड होतात.

इतक्या मोठ्या प्रमाणात ब्लॉगोस्फेर व इतर गोष्टी आपल्या जीवनाचा ताबा घेत असल्यामुळे आपण सर्व संगणक, इंटरनेट व इतर माहिती तंत्रज्ञानाच्या सोई - सुविधांची गुलामी करत आहोत की काय असे वाटू लागले आहे. सिटीझन्सचे रूपांतर नेटीझन्समध्ये झपाट्याने होत आहे. यानंतरच्या पुढच्या पिढीच्या दिवसाची विभागणी झोप व ऑनलाइन अशीच करावी लागणार आहे. झोपेतून उठल्या उठल्या मोबाइल कानाशी व लॅपटॉप समोर अशा अवस्थेतून ही पिढी जाणार आहे. गंमत अशी आहे की कुणीही उठावे व लाइक/डिसलाइक वर क्लिक करत रहावे अशी स्थिती आता आहे. विकिपिडियातील पानांचाही यातून सुटका नाही. हातात माउसचे बटन आहे, व नेट कनेक्ट आहे एवढ्याच भांडवलावर या गोष्टी सर्रासपणे होत आहेत. त्याचप्रमाणे सोशल नेटवर्कसुद्धा नेटिझन्सच्या मनमानीपणातून सुटलेले नाही.

ब्लॉग, फोरम, वा फेसबुक वरील प्रतिसाद/प्रतिक्रिया वाचत असताना चर्चेसाठीच्या धाग्याबद्दल (उगीचच्या उगीच) उलट - सुलट, टोकाचे व काही वेळा कुत्सित मत प्रदर्शन करत असल्याचे प्रमाण वाढत आहे. मराठी नेटवर जरी हे काही प्रमाणात कमी वाटत असले तरी इंग्रजीतील - विशेषकरून राजकीय, आर्थिक व सामाजिक विषयावरील - धाग्यांच्या संदर्भात नेटिझन्सचा भावनोद्रेक प्रकर्षाने जाणवतो. आपण केलेली विधाने, आपण लिहिलेले लेख लोकांनी जसेच्या तसे स्वीकारावे, त्याचे संदर्भ, अधिक माहिती विचारू नये असा एक नवा प्रवाह दिसतो. विशेषतः जेथे भावनांना हात घातला जातो. (ज्योतिष, वैद्यक, अस्मिता, इतिहास) तेथे हा प्रवाह अधिक दिसतो. क्षुल्लक विधानावरून तावातावाने भांडत असल्याचे चित्र बघायला मिळते. काही वेळा शिवराळ भाषा वापरली जाते. काहींना साधे लिहितानाही शिव्याची पेरणी करण्याचा सोस असतो. त्यांना साधे लिहिता येत नाही. साधे व सरळ लिहिल्यास आपल्याकडे कोणाचे लक्ष जाणार नाही, असा त्यांचा समज असतो. व अशा ट्रॉल्सच्या (trolls) संख्येत मोठ्या प्रमाणात भर पडत आहे.

परंतु मानसतज्ञांच्या दृष्टीने नेटिझन्सची ही वर्तणूक सवयीत बदलल्यास सामाजिक व संबंधित व्यक्तीच्या मानसिक आरोग्यास इजा पोचू शकते. म्हणूनच वेळीच जागे होऊन अशा गोष्टीवर अंकुश ठेवण्यासाठी काही निर्बंध घालण्याचे आग्रह ते धरू लागले आहेत.

मुळात अशा नेटिझन्सच्या बहुतेक प्रतिक्रिया केवळ आक्रमक या सदरात मोडतात. त्यातून काहीही अर्थबोध होत नाही. आपले म्हणणे कुणीच ऐकत (वाचत) नाही म्हणून ते वैतागलेले असतात. मानसतज्ञांच्या मते आपल्या

प्रतिक्रिया वा प्रतिसाद यात इतकी भावनिक गुंतवणूक करणेसुद्धा हानिकारक ठरणार आहे. गंमत अशी आहे की जेव्हा नेटिझन्स थंड डोक्याने विचार करू लागतात तेव्हा हे सर्व चुकीचे होते हेही त्यांना कळत असते.

**तरीसुद्धा ही मंडळी असे का वागतात?**

अनेक घटक एकाच ठिकाणी जमत असल्यामुळे उर्मटपणा, उद्धटपणा, आक्रमतकता इत्यादींचा विस्फोट होत असावा असे तज्ञाना वाटत आहे. मुळात प्रतिसाद देणारे व धागाकर्ते बिनचेहऱ्याचे, मुखवटे चढवलेले व एकमेकांना ओळखत नसल्यामुळे चिखलफेक करण्यात कुणालाही संकोच वाटत नाही. संताप व्यक्त करणारे कुठे तरी दूर असण्याची शक्यता असल्यामुळे आपले कुणीही वाकडे करणार नाही, आपल्याला शारीरिक इजा होणार नाही, याची त्यांना खात्री असते. समोरासमोर असल्यास अशा प्रकारची टीका टिप्पणी ते कधीच करणार नाहीत. याशिवाय प्रत्यक्ष बोलण्यापेक्षा काही तरी लिहिणे अगदी सोपे असते. मुळात ब्लॉग, फोरम, ई - मेल अकौंट, लॉगइन, पासवर्ड इत्यादीसाठी आर्थिक वा तांत्रिक अशी कुठलिही अडचण नसल्यामुळे जाता जाता पिंक मारणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

प्रतिसाद लिहिणाऱ्यांकडे भरपूर वेळ असणे हेसुद्धा एक कारण असावे. व एका प्रकारे ते त्यांचे स्वगत भाषणच असते. या स्वगत भाषणात कुठलिही टोकाची भूमिका घेतली तरी त्यांना जबाबदार धरता येत नाही. माणसं प्रत्यक्ष संवाद साधत असताना एकमेकांच्या देहबोलीनुसार आक्रमकता कमी जास्त करतात. कुठे थांबावे, कुठे रेटावे, याची कल्पना दोघांनाही असते. राग आला तरी ते व्यक्त करण्यात थोडीशी सुसंकृतता त्यात असते. त्यामुळे रागाच्या भरात दोन शब्द जास्त उच्चारले तरी काही वेळातच राग शांत होऊन संवाद मूळपदावर येऊ शकतो.

याचबरोबर आपण काही तरी भव्य दिव्य करत आहोत अशा पवित्र्याने नेटवरील प्रतिक्रिया लिहिली जात असते. मुळात हा पवित्रा तद्दन खोटा, अविचारी व अविवेकी असतो. दुसरे म्हणजे सुरक्षित ठिकाणी बसून काहीही खरडायला फार मोठे बुद्धीकौशल्यही लागत नाही. उपदेशाचे डोज पाजणे, सल्ला देत राहणे, प्रसंगाची चिरफाड करणे, मूळ मुद्दा सोडून कुठल्यातरी क्षुल्लक गोष्टीवर भाष्य करणे यातच ते स्वत:ला धन्य समजतात. त्यामुळे धाग्यावरील चर्चा भरकटत जाते व हाती काही लागत नाही.

अजून एका तज्ञांच्या मते नेटिझन्सच्या या उर्मटवृत्तीला काही अंशी इलेक्ट्रॉनिक माध्यम जबाबदार आहे. टीव्हीसारख्या माध्यमावरील चर्चेत भाग घेणाऱ्यासांठी आपण कसे बोलावे, कसे वागावे याबद्दल कुठलिही आचारसंहिता नाही. चर्चेपूर्वी कुणी तरी जबाबदार व्यक्ती काही ब्रीफिंग देत असेल की नाही याची कल्पना नाही. चर्चेच्या दरम्यान टोमणे मारणे, एकमेकाचे उखाळे पाखाळे काढणे, नको त्या गोष्टी उकरून काढणे, विषयाशी धरून न बोलणे इत्यादी गोष्टी न्यूज व इतर चॅनेल्सवर बघून सवय झालेले नेटिझन्स जेव्हा संधी मिळते तेव्हा झोडपून काढण्याच्या पावित्र्यात असतात. माध्यमं जर जबाबदारीने, संयमितपणे चर्चेचे संयोजन करत असते तर कदाचित नेटिझन्स एवढे आक्रमक झाले नसते.

एक मात्र खरे की इतर कुठल्याही माध्यमापेक्षा इंटरनेटचा वापर यानंतर मोठ्या प्रमाणात होणार आहे, हे मात्र नक्की. त्यामुळे नेटिझन्सच्या विधानांना गंभीरपणे घेण्याकडे कल वाढत जाणार. अशा वेळी काहीतरी पोरकट विधान करून स्वत:चे हसे करून घेण्यात हशील नाही, हे आता नेटिझन्सना कुणी तरी सांगण्याची गरज आहे. नेटवरील चर्चा सुरळितपणे चालावी ही संयोजकांची जबाबदारी असते. चर्चेतून काही तरी निष्पन्न होणे अपेक्षित असते. काही नवीन माहिती, माहितीत भर, नवीन मुद्दे, यामुळे चर्चा रंगू शकते. येथे मात्र त्याचीच उणीव भासत आहे. दुसऱ्या नेटिझन्सचे

काहीही ऐकायचे नाही हाच अजेंडा पुढे ठेऊन सर्व जण आक्रमकपणे चर्चेत भाग घेत असतात. आक्रमकतेने एखादा चांगला मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केल्यास वाचकांचे लक्ष मुद्याकडे न जाता आक्रमकतेकडेच जास्त जाते. त्यामुळे जे काही पटवून द्यायचे असते ते बाजूला राहते. व चर्चा भलत्याच ठिकाणी वाहवत जाते.

नेटिझन्सनी टीव्हीसारख्या माध्यमाचा कित्ता गिरवला पाहिजे अशी काही अट नाही. संयमितपणे व विचारपूर्वक केलेले भाष्य चर्चा पुढे नेण्यास मदत करत असते. त्यामुळे ब्लॉग्स व फोरमच्या चालकानी वेळीच दखल घेऊन अशा उर्मट नेटिझन्सना दूर ठेवण्यासाठी काही तंत्रज्ञान विकसित करण्याची वा नियमाची चौकट तयार करण्याची गरज भासत आहे.

*pkn.ans@gmail.com*

•••

# देव-धर्मवेड्या समाजाचं व्यंगचित्र

*अवधूत परळकर*

पुस्तक परीक्षण.....श्रद्धा-अंधश्रद्धा.....चिकित्सा....

*'देवनगरीत शेजाऱ्यावर प्रेम करणारे कमी आहेत, त्यामानानं शेजाऱ्यांच्या मांजरावर प्रेम करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. मांजरवेड्यांना इथे शहाणं समजलं जातं, मात्र अशा या प्रात:स्मरणीय मांजरांना देवनगरीत हमरस्त्यावर यायला बंदी आहे. कारण मांजरं माणसांना आडवं जाऊन त्यांचा खोळंबा करतात, ही सामूहिक श्रद्धा. देवनगरीत एकदा एक माणूस साप चावून मेला. त्याला जिवंत करण्यासाठी इथला सुप्रसिद्ध मांत्रिक लगबगीनं निघाला, पण वाटेवर मांजर आडवं गेलं म्हणून मेलेला माणूस जिवंत होऊ शकला नाही.. कामं उरकण्याचा कंटाळा करणाऱ्या देवनगरीच्या माणसांना मांजरं खूप आवडतात, असंही माझं निरीक्षण आहे..'*

'ईश्वर डॉट कॉम' या विश्राम गुप्ते यांच्या कादंबरीतला हा एक परिच्छेद. एवढ्यावरून या कादंबरीच्या जातकुळीची, पार्श्वभूमी म्हणून निवडलेल्या परिसराची कल्पना यावी. लेखकानं कल्पनेनं उभे केलेल्या एका जगात आणि एका विशिष्ट समाजात ही कादंबरी आपल्याला नेते. देवनगरी (सिटी ऑफ गॉड) हे या जगाचं नाव. देवनगरीतल्या हालचाली, तिथल्या रहिवाशांचं मानसिक, भावनिक पर्यावरण आणि त्यातून आकारलेलं वैचारिक, सांस्कृतिक आणि चर्चिक नाट्य हे सारं या कादंबरीत एका फॅण्टसीमय विश्वात खेळतं ठेवण्यात आलं आहे. प्रस्तावनेत लेखकानं मात्र आपली कादंबरी फॅण्टसी आहे हे नाकारलं आहे. ज्या नगरीत देवाची अधिसत्ता चालते ती देवनगरी, असं सांगून तो म्हणतो, 'आपला भारतच एक देवनगरी आहे. भारतीय देवनगरीतले रहिवासी आहेत.' त्याच्या मते, 'ईश्वर डॉट कॉम' ही कादंबरी म्हणजे देव-धर्म, संस्कृती आणि परंपरेच्या व्यापारीकरणाची धमाल कथा आहे. या चारही गोष्टी आज आपल्या देशातही धमाल कथा-उपकथांना जन्म देत आहेत. तेव्हा लेखकाचा दावा पूर्णपणे असत्य म्हणता येणार नाही. लिखाणाचा बाज विनोदी, भाषा अतिखट्याळ. अथपासून इतिपर्यंत खेळकर शैलीत लेखक देवनगरीची कहाणी

सांगतो. विनोद निर्मितीतला आवश्यक मानला जाणारा अतिशयोक्ती हा घटक इथं विपुल प्रमाणात आहे. अतिशयोक्तीची अतिशयोक्ती म्हणा ना! लेखकानं या तंत्राचा चतुर उपयोग करून घेतला आहे खरा, पण या तंत्रामुळेच या कथेचे पाय वास्तव भूमीपासून सुटले आहेत. लेखकाच्या आग्रहाशी प्रामाणिक राहून, त्याला सहमती दर्शवून या फॅण्टसीपर कथेचं वर्णन करायचं तर 'या कथेतलं वास्तव आहे काल्पनिक' असं म्हणता येईल. एक मात्र खरंय- पुस्तकातले अनेक तपशील आजच्या वातावरणाशी मिळतेजुळते आहेत. समाजाच्या आजच्या मानसिकतेवर भाष्य करण्यासाठी हा लेखनप्रपंच आहे; आणि त्यात लेखकाला कितपत यश आलं आहे हा वादाचा मुद्दा होऊ शकेल. पुस्तक हाती पडल्यावर त्यातलं कोणतंही पान उघडून वाचा, आपण एका आगळ्या दुनियेत येऊन दाखल झालो आहोत असा अनुभव येईल. देव-धर्म संकल्पनेवर विश्वास असणाऱ्यांच्या भाबडेपणानं देवनगरीत टोक गाठलं आहे. आज आपल्या समाजाचा प्रवासही त्याच दिशेनं चालला आहे.

कादंबरीला प्रथमपुरुषी एकवचनी निवेदन लाभलं असलं तरी 'मी'सह इतर पात्रांनी परस्परांचे विचार, कृती व अंधश्रद्धेनं ग्रासलेल्या देवभोळ्या परंपरावादी समाजावर केलेली अखंड व उलटसुलट चर्चा त्यात आहे. फाजील परंपराप्रेमातून जो चिकित्साशून्य समाज आकाराला येतो, त्याची रेवडी उडवणारं हे खटय़ाळ लेखन आहे. म्हटलं तर चित्र भयावह आहे, पण ते रेखाटण्यासाठी लेखकानं जो कुंचला वापरला आहे तो व्यंगचित्रकाराचा कुंचला आहे. 'ईश्वर डॉट कॉम' ही कादंबरी म्हणजे मॉडेल म्हणून समोर एक काल्पनिक समाज उभा करून चितारलेलं श्रद्धाप्रेमानं अंध झालेल्या आजच्या देववेडय़ा समाजाचं व्यंगचित्र आहे.

आजच्या धर्मकल्लोळी वातावरणातले ताजे संदर्भ कादंबरीची वाचनीयता वाढवायला उपयोगी पडले आहेत. ही कादंबरी आपल्याला देवधर्म, श्रद्धा, परंपरा या संकल्पना आणि त्यांनी मानवी व्यवहारात घातलेले घोळ यावर नुसती चर्चा करत नाही; ती त्याकडे आपल्याला उलटसुलट पाहायला लावते. प्रसंगी ती वाचकांचा वैचारिक गोंधळ उडवून देते. लेखकानं अवलंबलेल्या विडंबन शैलीतील भेदकता लक्षात घेता सनातनी लोक हे पुस्तक चार-पाच पानांपलीकडे वाचू शकतील असं वाटत नाही. पुस्तकातली टोकाची उपरोधिक भाषा या आजच्या परंपराप्रिय समाजगटाला औद्धत्यपूर्ण वाटली तर नवल नाही. नास्तिक वाचकांची समस्या आणखी वेगळी. इतका प्रखर सामाजिक विषय अशा प्रकारे थट्टा-मस्करीत मांडला जाणं त्यांना कदाचित रुचणार नाही. आजच्या वास्तव वातावरणावर गंभीर आणि थेट हल्ला केला जावा अशी आपली अपेक्षा असणं ठीक आहे. पण लेखक विश्राम गुप्ते यांनी हा मार्ग अवलंबला असता तर पेरुमल मुरुगन या तमिळ लेखकाचा मराठी अवतार आपल्याला पाहायला मिळाला असता. लेखकानं हे पुस्तक मुद्दामहून धर्म संकल्पनेची थट्टा उडवण्यासाठी लिहिलंय असं म्हणता येणार नाही. पण आपल्याकडल्या भावना-दुख्या जमावाचं काही सांगता येत नाही.

धर्माचे मानवी अन्वय आणि श्रद्धा आणि परंपरा या घटकांनी त्याची लावलेली विल्हेवाट सर्वासमोर खेळकरपणे मांडणं आणि त्या निमित्तानं भाषिक सादरीकरणाचे थोडेफार प्रयोग करू पाहणं, अशी भूमिका या लेखनामागे दिसते. धर्मवादीच धर्माकडे सदोष नजरेनं पाहाताहेत हे सर्वमान्य सत्य पुस्तकातल्या अनेक चर्चा आणि घटनांतून उघड होतं. देव-धर्म संस्कृती अन् परंपरेच्या व्यापारीकरणात हृदयातला ईश्वर हृदयातच हरवतो. उत्तर आधुनिक काळात तरी आपण विवेक हा तारणहार, समता हा ईश्वर अन् प्रेम ही सर्वात टिकाऊ परंपरा ही त्रिसूत्री मानणार आहोत का? असा सवाल पुस्तकाच्या ब्लर्बमध्ये विचारण्यात आला आहे. या कादंबरी लेखनामागील प्रेरणेचं एक अंग या प्रश्नातही सामावलेलं आहे.

विश्राम गुप्ते यांचा आजवरचा लेखन प्रवास नजरेखालुन घातला की ठळकपणे एक गोष्ट पुढे येते, ती म्हणजे हा लेखक नवतेचा खंदा पुरस्कर्ता आहे. मराठी वाङ्मयातील प्रायोगिकतेची तो नेहमी जाणीवपूर्वक दखल घेत आला आहे. नव्या प्रयत्नांचं कौतुक करण्यापेक्षा त्यांची चिकित्सा करण्याची भूमिका त्यानं वेळोवेळी अवलंबली आहे आणि या भूमिकेशी प्रामाणिक राहता यावं, म्हणून त्यानं स्वत:ला कंपूबाजीपासून दूर ठेवलं आहे. नव्या लेखनातील अभिनवता समजून घेणे आणि आपल्याला समजलेले वाचकांना समजावून सांगणे हे काम विश्राम गुप्ते व्रतस्थपणे करत आले आहेत. वाचकाभिमुख धोरण न अवलंबता त्यांनी सर्जनशील लेखन केलं आहे आणि समीक्षालेखन केलं आहे. या नव्या मंडळीचा अब्सर्ड रचनेकडे असलेला ओढा सर्वपरिचित आहे. हा आकृतिबंध स्वीकारला की स्वैर संचार करता येतो, मांडणीत लवचीकपणा येतो; चौफेर शेरेबाजी करता येते. 'ईश्वर डॉट कॉम'मध्ये लेखकाचं अबसर्डिटीचं आकर्षण पानोपानी दिसत राहतं. कादंबरीसाठी त्यांनी निवडलेल्या आशयसूत्राला त्याची गरजही होती. अबसर्डिटीच्या प्रेमप्रवाहात कथाविषय वाहून जाण्याचा धोकाही असतो. गुप्ते यांनी या प्रवाहावर नियंत्रण ठेवण्यात बऱ्यापकी यश मिळवलं आहे.

चिकित्सा या गोष्टीला सर्वाधिक महत्त्व देणाऱ्या लेखकाच्या कोणत्याही कलाकृतीकडे पाहताना आपणही चिकित्सक दृष्टिकोन ठेवायला पाहिजे. या नजरेनं 'ईश्वर डॉट कॉम'कडे पाहिलं, की काही गडबडी समोर येतात. या कादंबरीत उपरोधाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आशय मांडणीसाठी अत्यंत आवश्यक असा हा घटक आहे, पण कादंबरीत हा उपरोधाचा डोस जरा अतीच झाला आहे हे स्पष्टपणे सांगणं गरजेचं आहे. उपरोधिक विधानांचा अतिरेक आणि जागोजागी विनोदनिर्मिती करण्याचा अट्टहास लेखकानं टाळला असता तर या चर्चेला अधिक गांभीर्य प्राप्त झालं असतं. उपरोधाच्या या माऱ्यामुळे सुरुवातीची पानं वाचताना कादंबरीतील जगाशी समरस होणं कठीण होऊन बसतं. नंतर या भाषेची सवय होऊन जाते हा भाग अलाहिदा.

मीडियाचा प्रतिनिधी असावा म्हणून ज्या वर्तमानपत्राचा वावर या कादंबरीत आहे, त्या वर्तमानपत्राचं नाव 'दै. भंबेरी' आहे. वृत्तपत्राच्या नावातून विनोद साधण्याचा प्रकारही खूप ओल्ड फॅशन झाला. अगदी आचार्य अत्र्यांच्या काळातला. हा ढोबळपणा कादंबरीच्या एकूण परिपक्व मांडणीशी विसंगत वाटतो.

धर्म, देव, श्रद्धा, परंपरा यासंदर्भातल्या चर्चेत सहभाग घेणारी या कादंबरीतली पात्रं चर्चेत विभिन्न बाजूंचे विचार यावेत, म्हणून मुद्दामहून नेमलेली वाटतात. अशा नेमणुकीमुळे संवादातील आणि कादंबरीतल्या नसांगक वातावरणाला धक्का पोचतो. रचनाबद्ध आराखड्यात कादंबरीचा आशय फिरू लागतो. उदाहरणार्थ एक उदारमतवादी हिंदू, दुसरा धर्माला वैज्ञानिक अधिष्ठान द्यायला धडपडणारा कोणीतरी एक दलिताचा नेता असल्याचा दावा करणारा आणि हिंदू धर्माची चिकित्सा करू पाहणारा.. एखाद्या व्यावसायिक नाटकात सापडावीत अशी ही फिल्डिंग आहे. देव-धर्म, परंपरा यावरल्या चिकित्सक चर्चेवर रोख असल्यानं कृत्रिम रचनेतून निर्माण होणाऱ्या साचेबद्धपणाकडे लेखकानं दुर्लक्ष केलं असेल, पण याचे वाचनीयतेवर विपरीत परिणाम झाले आहेत. वाचकाला हा सर्व विशिष्ट विचारसरणी रेटण्यासाठी आयोजलेला खेळ आहे असं वाटू लागतं.

मात्र, काही प्रमाणात साचेबंद रचना असूनही 'ईश्वर डॉट कॉम' वाचकांना धरून ठेवते, ती त्यातल्या चर्चेमुळे आणि कादंबरीभर पेरल्या गेलेल्या हुशार, चमकदार विधानांमुळे. सुखवस्तूची व्याख्या स्पष्ट करताना एके ठिकाणी म्हटलंय, 'सुखवस्तू म्हणजे वस्तू विकत घेऊन ज्यांना सुख मिळतं तो वर्ग. दुसऱ्या एका ठिकाणी विधान येतं- 'संस्कृती संवर्धन त्रस्त किरकिऱ्या माणसाकडून होणार नाही, त्यासाठी माणूस सुरक्षित आणि सुखवस्तूच हवा,' अशी अनेक उदाहरणं

देता येतील. मात्र अशा चतुर विधानातून लेखक दिसतो. इथं कादंबरीच्या विषयनिवडीतून, आशयामागील भूमिकेतून, प्रसंगातून पात्रांच्या तोंडच्या संवादातून विश्राम गुप्ते हा पुरोगामी आधुनिक विचाराचा लेखक, समीक्षक दिसत राहतो. लेखकाच्या विचारसरणीचं प्रतिबिंब साहित्यकृतीत पडणं हे अटळ असतं. भल्या-भल्यांची यातून सुटका झालेली नाही.

देव-धर्म, परंपरा या प्रतिगामी संकल्पनेबाहेर पडून जे स्वतंत्रबुद्धीनं आपल्या आयुष्याला सामोरे जाऊ पाहताहेत अशा वाचकांना देव-धर्म, परंपरा याची ही गमतीशीर चर्चा केवळ वाचनीय वाटणार नाही तर सुखावून सोडेल. कादंबरीभर विखुरलेली आपल्या विचारांना दुजोरा देणारी विधानं वाचताना त्यांना कादंबरीच्या रचीव स्वरूपाचा, साचेबद्ध पात्रयोजनेचा विसर पडेल आणि अतिरिक्त उपरोधही सुसह्य होईल. याला वाचकाभिमुखता म्हणायची का? आणि वाचकाभिमुख म्हटलं तर आजच्या धर्मप्रदूषित वातावरणात असे वाचक किती? समाजप्रबोधनाचं ठाम उद्दिष्ट लेखकासमोर असेल असं वाटत नाही. अभिनिवेश आशयापेक्षा त्याच्या प्रयोगशील मांडणीत आहे. पण तरीही एक शक्यता जाता जाता व्यक्त करावीशी वाटते. कादंबरीच्या आशय-विषयाशी पूर्णत सहमत नसलेला, देव-धर्म पाळणारा पण त्यातल्या पारंपरिक दृष्टिकोनावर आणि कर्मकांडांवर संशय घेणारा मोठा वर्ग आज समाजात आहे. या वर्गाला ही कादंबरी आणि त्यात उभं केलेलं चर्चानाट्य आकर्षित करू शकले; त्यातून बाहेर येणारा आशय त्यांना नेणिवेच्या पातळीवर अस्वस्थ करून सोडू शकला तर ते विश्राम गुप्ते यांच्या 'ईश्वर डॉट कॉम'चं मोठं यश म्हणता येईल. या यशापुढं समीक्षक या कादंबरीचं मूल्यमापन कसे करतात, मराठी साहित्यविश्वात या कादंबरीचं योगदान काय, हे प्रश्न बिनमहत्त्वाचे ठरतात.

**'ईश्वर डॉट कॉम'**
विश्राम गुप्ते,
राजहंस प्रकाशन, पुणे,
पृष्ठे- 300, किंमत- 300 रुपये.

महाराष्ट्र टाइम्सच्या सौजन्याने

*awdhooot@rediffmail.com*

•••

## मरणभय-आत्मा-पुनर्जन्म

*प्रा. य. ना. वालावलकर*

सजीव येई जन्मासी। अटळ असे मृत्यू त्यासी।
जाणीव प्रत्येक व्यक्तीसी। जी का असते सज्ञानी ॥1॥
अनुभव आणि निरीक्षण । परस्पर संवाद , वाचन ।
निष्कर्ष तर्काने शोधून । जाणीव विकसित होतसे ॥2॥
सजीवासी मृत्यू अटळ । प्राण्यांना नकळे सकळ ।
सज्ञानी मानव केवळ । या सत्यासी जाणतसे ॥3॥
व्याघ्र-सिंह- ससे-भेकरे । मेंढ्या-बकऱ्या-गाई-गुरे ।

मरणाधीन असती सारे । परि ते सत्य न जाणती ॥4 ॥
पुराणांतरी सात जण । अश्वत्थामा-बळी-बिभीषण ।
परशुराम-व्यास-हनुमान । तैसा कृप तो सातवा ॥5॥
यांसी म्हणितले चिरंजीव । कल्पना केवळ मानीव ।
त्या त्या काळी सजीव । ते असतील सातही ॥6॥
परंतु काळीं सांप्रत । या सातांतील जिवंत ।
कोणीही नसे निश्चित । वैज्ञानिक सत्य हे ॥7॥
देव मानिले अजरामर । नाही मरण नसे आजार ।
स्वर्गीं तयांचा संचार । सारे कल्पित डोलारे ॥8॥
तैसेचि ते अमृतसत्त्व। नाही तयासी अस्तित्व ।
मानव इच्छिती अमरत्व । मानसिकता ऐसी दिसे ॥9॥
मरण अटळ सर्वां पटे । परी अंतरी भीती दाटे ।
मरणासंबंधीचा शब्द वाटे । अशुभ, अभद्र, अमंगळ ॥10॥
मयत-प्रेत-मढे- स्मशान । चिता-मर्तिक आणि सरण ।
तिरडी-गोवऱ्या-मसण । ऐशा शब्दां घाबरती ॥11॥
दशक्रिया-अकरावे-बारावे । शब्द अपवित्र न उच्चारावे ।
शुभकार्यीं अवश्य टाळावे । पाळिती संकेत अलिखित॥12॥
भान औचित्याचे असावे । भय शब्दांचे नसावे ।
कोठे काहीही बोलावे । ऐसा अनर्थ न घ्यावा ॥13 ॥
घडण्याची जें निश्चिती । टाळणे न कोणा हाती ।
तयाविषयीं ऐसी भीती । वाटे कोण्या कारणे ॥14॥
बुद्धिवंतासी ऐसे भय ।अनावश्यक अशोभनीय ।
मरणी भयदायक काय । घटना एक नैसर्गिक ॥15 ॥
वेदकाळी वदले चार्वाक । मरणीं गूढ न काही एक ।
जीवनी भोगावे सुख । आनंदाने मनुजांनी ॥16॥
यद्यपि मरण नैसर्गिक । जगावे काळ अधिकाधिक ।
प्राणिमात्रासी प्रत्येक । स्वाभाविक ऊर्मी ही ॥17 ॥
म्हणौनि मृत्यू अप्रिय । टाळण्या सजीव सक्रिय ।
परंतु मानवा मरणभय । कदापीही नसावे ॥18॥
प्रत्येकासी येते मरण । याचे जैविक कारण ।
जीवशास्त्रज्ञां उमगले जाण । सर्वमान्य असे हे ॥19 ॥
टेलोमियर-जिनोम-जीन । गुणसूत्रे पेशी विभाजन ।
जिनोम लांबी त्रुटीकरण । प्रकरण ऐसे बिकट हे ॥20 ॥

द्यावे इथेच सोडोन । परी ऐसे जाणोन ।
नैसर्गिक मरणाचे कारण । ज्ञात आता मानवा ॥21 ॥
अटळ मरण नि:संदेह । कांही न उरे जाता देह ।
जगाचा ऐसा चिर विरह ।असह्य वाटे मनुजासी ॥22॥
यास्तव आत्मा असे अमर । ऐसा रचिला विचार ।
नाशवंत केवळ शरीर ।आत्मा जन्मे पुन:पुन्हा ॥23॥
आत्मयासी शस्त्र छेदीना ।आत्मयासी अग्नी जाळीना ।
आत्मयासी पाणी भिजवीना । ऐसी ख्याती आत्मयाची ॥24॥
आत्मा नाही देहीं कोठे । आत्म्याचे अस्तित्वचि खोटे ।
परी श्रद्धाळूंसी सारे पटे । कारण अमरत्व इच्छिती ॥25 ॥
शरीर म्हणजे मी नोहे । ओळख माझी आत्मा आहे ।
तो अमर म्हणौनि पाहे । मीही अमर जाहलो ॥26॥
विचार करिता खोटे सारे । श्रद्धावंता वाटे खरे।
जगी वेगे असत्य पसरे । सत्या लागे विलंब ॥27॥
संतवाणी- कथा -कीर्तने । गोष्टी-गाणी- आख्याने ।
नाटके-चित्रपट-प्रवचने । अनेक माध्यमे प्रभावी ॥28॥
यांद्वारे पुनर्जन्म संकल्पना । सातत्याने जनमना--।
वरती बिंबविली भावना । मनी ठसोनी दृढ झाली ॥29॥
असोनी असत्य आघवे। सश्रद्ध मानिती भावे ।
शंका काही न उद्भवे । सत्यासत्याविषयींची ।।30 ॥
आहे का जर पुनर्जन्म । निश्चित होता गतजन्म ।
त्या जन्मीचे नाम-धाम । स्मरते काय कोणासी ॥31॥
आपण प्रयत्न करावे । गतजन्मीचे काही आठवावे ।
तैसेचि परिचितां पुसावे । कोणा कांही स्मरते का ॥32॥
याचे उत्तर प्रामाणिक । नकारार्थी देती लोक ।
पुनर्जन्म आहे निरर्थक । ऐसेचि सिद्ध होतसे ॥33॥
गतजन्मीचे काहीही । आठवते ना कोणाही ।
पुनर्जन्म कल्पना ही । सत्य कैसी मानावी ? ॥34॥
शरीरशास्त्रग्रंथी देख । आत्म्याचा ना नामोल्लेख ।
इंद्रियांचे कार्य हृदयादिक । तयांचे वर्णन परिपूर्ण ॥35॥
शरीर अंतर्बाह्य अभ्यासिती ।शल्यकर्म यशस्वी करिती ।
परी आत्म्याचे ना नाम घेती । कधीही देहीं न दिसे तो ॥36॥
यापरी आत्मा नाही नाही । कोणाच्याही हृदयीं देही ।

तैं पुनर्जन्म कोण घेई । असत्य पुनर्जन्म संकल्पना ॥37॥
पहिला तैसाचि शेवटचा । एकचि जन्म प्रत्येकाचा ।
गतजन्म-पुनर्जन्म कोणाचा । शक्य नसे कालत्रयी ॥38॥
जाणावे आपण सर्वांनी । शंका असली काही मनीं ।
विचारे विवर-विवरोनी । निरसन पूर्णत्वे करावे ॥39॥
असे सत्य वैज्ञानिक । जाणिती मानिती जे विवेक ।
पूर्वग्रहपीडित श्राद्धिक । अज्ञानासी कवटाळिती ॥40॥
आत्मा-पुनर्जन्म-संचित । अज्ञान सारे खचित ।
यास्तव याची संगत । निश्चये आपण सोडावी ॥41॥
वृथा भीती मरणाची । काढून टाकावी अंतरीची ।
अंतिम घटना आयुष्याची । काही नाही तदनंतर ॥42॥
अर्चिरादि मार्ग सूर्यलोक । चंद्रलोक विद्युतलोक ।
पितृयान देवयान ब्रह्मलोक । कल्पित साऱ्या भराऱ्या ॥43॥
जाणणे हे आवश्यक । मानव प्रजातीं जन्म एक ।
लाभला गेला निरर्थक । ऐसे होईल अन्यथा ॥44॥

ynwala@gmail.com

•••